रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १६ ◆ अंक १५२
www.ramprahar.com
मंगळवार, १९ डिसेंबर २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

खारघरमध्ये अनधिकृत बांधकाम हटवून वृक्षारोपण/३
पेण बलात्कार, हत्येप्रकरणी ३० डिसेंबरला निकाल/५
राष्ट्रीय खो-खो स्पर्धेत महाराष्ट्राला दुहेरी मुकूट/८

## राज्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांना बोनसची घोषणा



**नागपूर :** राज्यातील शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी टास्क फोर्सचे पुनर्गठन करण्याचा तसेच धान उत्पादक शेतकऱ्यांना या वर्षी प्रति हेक्टरी २० हजार रुपये बोनस देण्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोमवारी (दि.१८) विधानसभेत केली. महाराष्ट्रात प्रथमच कांद्याची महाबँक स्थापन करण्यात आल्याचे जाहीर करतानाच छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेमध्ये ४४ लाख शेतकऱ्यांना १८ हजार ७६२ कोटी इतका कर्जमाफीचा लाभ देण्यात आला, मात्र सॉफ्टवेअरमध्ये त्रुटी निर्माण झाल्याने सहा लाख ५६ हजार शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहिले. या पार्श्वभूमीवर ६.५६ लाख शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ देण्याचेही मुख्यमंत्री शिंदे यांनी या वेळी सभागृहात जाहीर केले. **(संबंधित वृत्त पान २ वर..)**

# ‘दिबां’च्या नावाचा ठराव अंतिम टप्प्यात

## विमानतळाचे काम पूर्ण होताच मंजुरी; केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांची माहिती

**डोंबिवली : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दिवंगत दि.बा.पाटील यांचे नाव देण्याचा राज्य सरकारने केंद्राकडे पाठविलेला ठराव मंजुरीसाठी आता अंतिम टप्प्यात आहे. विमानतळाचे काम पूर्ण होताच केंद्राकडून तो मंजूर करून विमानतळाला ‘दिबां’चे नाव देण्यात येईल, अशी ग्वाही केंद्रीय पंचायतराज राज्यमंत्री कपिल पाटील यांनी दिली आहे.

आगरी युथ फोरमने डोंबिवली येथे आयोजित केलेल्या १९व्या अखिल भारतीय आगरी महोत्सवात लोकनेते दि.बा.पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ या विषयावर



पत्रकार अनिकेत घमेंडी यांनी केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांची मुलाखत घेतली. त्या वेळी ते बोलत होते. अखिल आगरी समाज परिषदेचे अध्यक्ष आणि विमानतळ नामकरण सर्वपक्षीय कृती समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील हे प्रमुख पाहुणे म्हणून या वेळी उपस्थित होते. **(पान २ वर..)**

### आगरी भाषेत संवाद साधा

आगरी भाषेविषयी बोलताना केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांनी सांगितले की, इतर समाजातील नागरिक समाज घटकांबरोबर बोलताना आपल्या मातृभाषेत बोलतात, पण अनेक आगरी बांधवांना आगरी भाषेत बोलायची लाज वाटते. आपण आपल्या भाषेला प्राधान्य न दिल्यास आपली आगरी भाषा लोप पावेल. तसे होऊ नये यासाठी आपली आगरी भाषा आपण सर्वांनी बोलली पाहिजे.

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते गव्हाण येथील स्मशानभूमीचे लोकार्पण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आमदार महेश बालदी यांच्या स्थानिक विकास निधी २५१५च्या माध्यमातून गव्हाण येथे उभारण्यात आलेल्या स्मशानभूमीचे लोकार्पण माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते सोमवारी (दि.१८) करण्यात आले.

उरण विधानसभा मतदारसंघात आमदार महेश बालदी यांच्या प्रयत्न व पाठपुराव्यामुळे अनेक कामे मार्गी लागत आहे. त्यानुसार गव्हाण येथे स्मशानभूमीचे काम पूर्णत्वास आले आहे. गेली दहा-पंधरा वर्षे या स्मशानभूमीचे काम रखडले होते. आमदार महेश बालदी यांनी या संदर्भात पाठपुरावा केला आणि त्यांच्या माध्यमातून ही स्मशानभूमी उभारण्यात आली आहे. आता ही नव्याने उभारण्यात आलेली स्मशानभूमी पुढची पन्नास वर्षे टिकून राहील



असे काम झाले आहे. अशाच प्रकारच्या वेगवेगळ्या सुविधांसाठी आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी आणि आम्ही सर्व जण आपल्या पाठीशी ठामपणे उभे आहोत, असे प्रतिपादन लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी या वेळी केले. पुढे बोलताना त्यांनी सर्वांनी एकत्र येऊन जागरूक राहिल्यास आपल्या परिसराचा योग्य असा विकास करता येईल, असे अधोरेखित केले.

या कार्यक्रमास माजी पं.स. सदस्य भाऊशेठ पाटील, गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, भाजप तालुका चिटणीस जयवंत देशमुख, कोळी समाजाचे जिल्हाध्यक्ष विश्वनाथ कोळी, वाहतूक सेल जिल्हाध्यक्ष हेमंत ठाकूर, कामगार नेते मोतीलाल कोळी, ग्रामपंचायत सदस्य योगिता भगत, कामिनी कोळी तसेच महादेव कोळी, अशोक कडू, श्रीकांत देशमुख, सुहास भगत, सुनील कोळी, मच्छीमार सोसायटीचे चेअरमन चंद्रकांत कोळी, स्नेहलता ठाकूर, परशुराम वास्कर, सुरेश वास्कर, राजकिरण कोळी, आकाश कोळी, दीपक देशमुख, प्रमोद देशमुख, बाळकृष्ण कोळी, रामनाथ तांडेल, महेंद्र पाटील, सोमनाथ भगत, रवींद्र ठाकूर, अनिकेत कोळी, विनायक कोळी, के.डी. कोळी, विदुला इन्टरप्राईजेसचे प्रोप्रायटर मयूर ठाकूर आदी उपस्थित होते.



## ‘त्या’ फोटोचा दाऊदशी दूरपर्यंत संबंध नाही!

### मंत्री गिरीश महाजन यांनी आरोप फेटाळले

**नागपूर : प्रतिनिधी**

माझ्याविरोधात एकनाथ खडसेंनी उद्वेगातून जुने आरोप केले आहेत. कुंभमेळ्याच्या वेळचा तो फोटो आहे. त्या वेळी हे लोक कोण होते, काय होते याची आम्हीच चौकशी करून घेतलेली आहे. तेव्हाचा लेखी अहवाल आजही समोर आहे. त्याचा दाऊदशी दूरपर्यंत संबंध नाही, अशा शब्दांत मंत्री गिरीश महाजन यांनी आरोप फेटाळले आहेत.



डॉन दाऊद इब्राहिमचा साथीदार सलीम कुत्तासोबत मंत्री गिरीश महाजन यांचे संबंध असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस खासदार शरद पवार गटाचे नेते एकनाथ खडसेंनी केले आहेत. त्यावर प्रतिक्रिया देताना मंत्री महाजन म्हणाले की, नऊ वर्षांपूर्वीचा फोटो दाखवून खडसे काय सांगताहेत? त्या वेळी कुंभमेळा होता व त्या निमित्ताने सर्व धर्मीय लोक उपस्थित होते. मुस्लिम धर्मातील एका नेत्याच्या मुलाचे लग्न होते. त्या लग्नाला २० ते २५ हजार लोक हजर होते. त्या लग्नाला सर्व नेते उपस्थित होते. तेव्हाचा कुठलातरी फोटो दाखवायचा आणि काहीही आरोप करायचे काम सुरू आहे.

एकनाथ खडसेंचे राजकीय अस्तित्व राहिलेले नाही. आर्थिकदृष्ट्यासुद्धा ते बुडाले आहेत. त्यांना १६७ कोटी रुपये भरायचे आहेत. त्यामुळे मानसिकदृष्ट्या त्यांच्या डोक्यावर परिणाम झाला आहे, असा हल्लाबोल मंत्री महाजन यांनी केला.

## संसदेत पुन्हा गदारोळ; ६७ विरोधी खासदार निलंबित

**नवी दिल्ली :** संसदेच्या सुरक्षेवरून सोमवारी (दि.१८)सुद्धा विरोधी पक्षांच्या खासदारांनी लोकसभा आणि राज्यसभेत प्रचंड गदारोळ केला. दरम्यान, लोकसभा अध्यक्षांनी ३३ खासदारांना लोकसभेतून, तर ३४ खासदारांना राज्यसभेतून निलंबित केले आहे.

लोकसभेतून निलंबित करण्यात आलेल्या खासदारांमध्ये अधीर रंजन चौधरी, अपूर्वा पोद्दार, प्रसून बॅनर्जी, मोहम्मद वसीर, जी सेल्वम, सीएन अन्नादुराई, डॉ.टी सुमती, के नवासकानी, के वीरस्वामी, एनके प्रेमचंद्रन, सौगत रॉय, शताब्दी रॉय, असिथ कुमार मल, कौशलेंद्र कुमार, अँटोनी कुमार, एस.एस. पलनामनिक्कम, तिरुवरुस्कर, प्रतिमा मंडल, काकोली घोष, के मुरलीधरन, सुनील कुमार मंडल, एस. रामा. लिंगम, के सुरेश, अमर सिंह, राजमोहन उन्नीथन, गौरव गोगोई आणि टीआर बालू यांचा समावेश आहे. सभागृहातील गदारोळामुळे या ३० खासदारांना निलंबित करण्यात आले आहे, तर विशेषाधिकार समितीचा अहवाल येईपर्यंत के जयकुमार, विजय वसंत आणि अब्दुल खालिक यांना निलंबित करण्यात आले आहे. **(पान २ वर..)**

## निवडक


### एनआयएचे चार राज्यांत छापे; म्होरक्यासह आठ जण अटकेत

**मुंबई :** एनआयए अर्थात राष्ट्रीय तपास यंत्रणेच्या पथकांनी सोमवारी (दि.१८) महाराष्ट्रासह चार राज्यांमध्ये १९ ठिकाणी छापे टाकले. या कारवाईत एनआयएने आठ जणांना बेड्या ठोकल्या आहेत. यामध्ये आयसीसच्या एका म्होरक्याचा समावेश आहे. मिनाझ उर्फ सुलेमान असे त्याचे नाव आहे. आरोपींकडून केमिकल्स, संशयास्पद कागदपत्रे, रोख मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

### दिल्ली मद्य घोटाळा : सीएम केजरीवालांना ईडीची नोटीस

**नवी दिल्ली :** मद्य घोटाळाप्रकरणी मनी लॉण्डरिंचा तपास करीत असलेल्या सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) दिल्लीचे मुख्यमंत्री व आम आदमी पक्षाचे सर्वेसर्वा अरविंद केजरीवाल यांना पुन्हा एकदा नोटीस पाठवली आहे. ईडीने केजरीवाल यांना २१ डिसेंबरला अधिकाऱ्यांसमोर चौकशीसाठी हजर राहण्यास सांगितले आहे.

## खारघर मॅरेथॉन २०२४च्या नियोजनासंदर्भात आज बैठक



**खारघर : रामप्रहर वृत्त**

रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स आणि खारघर रेसिडेन्शिअल वेल्फेअर असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने खारघर मॅरेथॉन २०२४चे आयोजन करण्यात येत आहे. यंदाच्या या १४व्या स्पर्धेच्या नियोजनासाठी मंगळवारी (दि.१९) सायंकाळी ६ वाजता खारघर सेक्टर १९ येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये बैठक आयोजित करण्यात आली आहे.

धावपटू आणि क्रीडारसिकांसाठी पर्वणी तसेच नवी मुंबईतील सर्वांत मोठी असलेली खारघर मॅरेथॉन आगामी २०२४मध्येही होणार आहे. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि महापालिकेचे माजी सभागृह नेते व स्पर्धा प्रमुख परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली होणारी ही स्पर्धा दरवर्षी सामाजिक हिताचे घोषवाक्य घेऊन आयोजित करण्यात येते. स्पर्धेस सेलिब्रेटी आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती लाभत असते.

सन २००६मध्ये पनवेल मॅरेथॉनच्या अनुषंगाने या स्पर्धेला प्रारंभ झाला. प्रथम आयोजनापासून ते आजपर्यंत उत्तम आणि नीटनेटक्या आयोजनामुळे ही स्पर्धा उत्तरोत्तर यशस्वी होत गेली व ती आता खारघर मॅरेथॉन नावाने ओळखली जाते. २०२४च्या या मॅरेथॉन नियोजनासाठी मंगळवारी बैठक आयोजित करण्यात आली आहे. या वेळी विविध विषयांवर चर्चा करण्यात येणार आहे. या बैठकीस उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.


## तळीयेच्या दरडग्रस्तांना मिळणार पक्की घरे

### ५ जानेवारीला शासन आपल्या दारी कार्यक्रमात वितरण

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्याच्या महाड तालुक्यातील तळीये येथील दरड दुर्घटनेतील ६६ कुटुंबांची पक्क्या घरांची प्रतीक्षा अखेर संपली आहे. ५ जानेवारी रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते शासन आपल्या दारी कार्यक्रमात या दरडग्रस्तांना घरांचे वितरण करण्यात येणार आहे.

तळीये कोंढाळकरवाडी येथे २२ जुलै २०२१ रोजी दरड कोसळली आणि हाहाकार उडाला. दुर्घटनेत ६६ घरे गाडली जाऊन ८७ ग्रामस्थांना प्राण गमवावे लागले. यापैकी सुमारे ५४ जणांचे मृतदेह सापडले. उर्वरित मृतदेह ढिगाऱ्याखालीच गाडले गेले. या दुर्घटनेत बाधित






झालेल्या ६६पैकी २५ कुटुंबांचे स्थलांतर सुरक्षितस्थळी कंटेनरमध्ये करण्यात आले. उर्वरित कुटुंबांनी आपल्या निवाऱ्याची सोय इतरत्र केली होती. या ६६ दरडग्रस्तांसह तळीयेतील धोकादायक परिसरातील १९७ घरांमधील कुटुंबीयांचेही पुनर्वसन करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार भूसंपादनाची जबाबदारी रायगड जिल्हाधिकाऱ्यांवर, घरांच्या बांधकामाची जबाबदारी म्हाडाच्या कोकण मंडळावर, तर प्रकल्पातील पायाभूत सुविधा विकासाची जबाबदारी जिल्हा परिषदेवर सोपविण्यात आली.

रायगड जिल्हाधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली १४.६४ हेक्टर जागेवर २६३ घरांचा प्रकल्प हाती घेण्यात आला आणि कामास सुरुवात झाली. पहिल्या टप्प्यात २६३पैकी २०० घरांच्या कामाला सुरुवात करण्यात आली. यापैकी ६६ घरांचे काम प्राधान्याने पूर्ण करून बाधितांना घरांचा ताबा देण्याचा निर्णय म्हाडा आणि जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला होता. कोकण मंडळाने घरांचे बांधकाम पूर्ण केल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांचा ताबा घेणे अपेक्षित होते, मात्र काही कारणाने यास विलंब झाला. आता ६६ घरांचे काम पूर्ण झाले असून ५ जानेवारी रोजी या घरांचा ताबा देण्याचा निर्णय पालकमंत्री उदय सामंत यांच्याबरोबर झालेल्या बैठकीत घेण्यात आल्याचे रायगडचे जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांनी सांगितले.

माणगाव येथील लोणेरे येथे ५ जानेवारी रोजी शासन आपल्या दारी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात तळीयेतील दरडग्रस्तांना घरांचे वितरण करण्यात येणार असल्याची माहिती डॉ. म्हसे यांनी दिली.

## येळकोट येळकोट जय मल्हार!



**अलिबाग : प्रति जेजुरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वरसोली गावातील खंडोबा मंदिरात चंपाषष्ठी उत्सव सोमवारी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. रायगडसह ठाणे, वर्सोवा व मुंबई येथील भाविकांनी खंडेरायाचे दर्शन घेण्यासाठी मंदिरात गर्दी केली होती. या वेळी येळकोट येळकोट जय मल्हार असा जयघोष करीत भंडाऱ्याची उधळण करण्यात आली. (वृत्त पान ५ वर..)**

## रामबागच्या वर्धापन दिनानिमित्त महापूजा, सांस्कृतिक कार्यक्रम

**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

आबालवृद्धांचे आकर्षण असलेल्या पनवेल तालुक्यातील न्हावेखाडी येथील रामबाग या उद्यानाचा पहिला वर्धापन दिन सोहळा येत्या शुक्रवारी (दि.२२) आहे. यानिमित्त श्री सत्यनारायणाची महापूजा आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

दुबईतील मिरॅकल गार्डनच्या धर्तीवर न्हावेखाडी येथील श्री म्हसेश्वर मंदिर परिसरात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या संकल्पनेतून रामबाग साकारली आहे. या उद्यानाच्या वर्धापन दिनानिमित्त शुक्रवारी सायंकाळी ६ वाजता श्री सत्यनारायणाची महापूजा आणि रात्री ८ वाजता वीरभूमी इंटरटेंमेंट (घणसोलीकर) प्रस्तुत ७० कलाकारांचा संच पारंपरिक आगरी-कोळीगीतांचा बहारदार कार्यक्रम सादर करणार आहे.

या वेळी माजी खासदार संजीव नाईक, आमदार रविशेठ पाटील, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली होणाऱ्या या सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन श्री म्हसेश्वर मंदिर कमिटीचे अध्यक्ष सी.एल. ठाकूर आणि रामबाग व्यवस्थापन कमिटीचे अध्यक्ष सागर ठाकूर यांनी केले आहे.

## दाऊद इब्राहिम प्रकरणात पाकिस्तानची गोची

### अ‍ॅड. उज्ज्वल निकमांकडून वर्मावर बोट

**अलिबाग : प्रतिनिधी**

कुख्यात डॉन दाऊद इब्राहिम याच्यावर पाकिस्तानात विषप्रयोग झाल्याच्या बातम्या समाजमाध्यमे आणि प्रमुख माध्यमांमध्ये झळकत आहेत. दाऊदवर विषप्रयोग झाला आहे किंवा नाही यावर पाकिस्तान काहीच बोलू शकत नाही, कारण दाऊद पाकीस्तानमध्ये आहे हेच ते मान्य करीत नाहीत. दुसरी बाब म्हणजे हा विषप्रयोग भारताने केला असेही बोलू शकत नाही. दाऊद प्रकरणात पाकिस्तानची गोची झाली असून त्यांची अवस्था अडकित्त्यातील सुपारीसारखी झाली आहे, अशी प्रतिक्रिया विशेष सरकारी वकील अ‍ॅड. उज्ज्वल निकम यांनी दिली.

डॉन दाऊद इब्राहिम याचा प्रमुख सहभाग असलेल्या १९९३च्या मुंबई साखळी बॉम्बस्फोट खटल्यातील सरकारी वकील अ‍ॅड. उज्ज्वल निकम यांनी विषप्रयोगाच्या वृत्तावर बोलताना म्हटले की, पाकिस्तानचे दुट्टपी बोलणे जगासमोर येऊ नये



यासाठी त्यांनी देशातील इंटरनेट सुविधा बंद केली आहे. जेव्हा पाकिस्तानमध्ये अंतर्गत यादवी घडते किंवा आपल्या गोष्टी जगासमोर कळू नये त्या वेळी असे प्रकार पाकिस्तान करतो. इंटरनेट सेवा बंद झाल्याचे पाकिस्तानच्या माध्यमांनी जाहीर केले आहे. त्यांनी दाऊदवर विषप्रयोग झाल्याचे म्हटले आहे. त्यामुळे पाकिस्तानची नाचक्की झाली आहे. अमेरिकेनेही दाऊद याला मोस्ट वाँटेड दहशतवादी म्हणून जाहीर केले आहे, कारण दाऊद हा अल-कायदा या दहशतवादी संघटनेला मदत करीत होता.

मुंबई साखळी बॉम्ब स्फोट प्रकरणात दाऊद हा आरोपी होता. दुबई येथे हा प्लॅन रचण्यात आला. या कटात कोण कोण सामील होता याचा खुलासा यात सामिल असलेल्या एका आरोपीला माफीचा साक्षीदार बनवून न्यायालयात केला होता. या आरोपीने कट कसा रचला, पाकिस्तानमध्ये कसे नेले, पाकिस्तान विमानतळावर आमचे पासपोर्ट कसे तपासण्यात आले नाही याची कबुली दिली आहे. त्यानंतर दाऊद हा दहशतवादी म्हणून हवा होता, तो मिळत नव्हता. आम्ही म्हणत होतो तो पाकिस्तानमध्ये लपला आहे, मात्र ते नाकारत होते. आता लबाड लांडग्याचे पाकिस्तानचे ढोंग उघडकीस आले आहे, असे अ‍ॅड. उज्ज्वल निकम यांनी म्हटले.

# बळीराजाला दीड वर्षात ४४ हजार २७८ कोटींची मदत

## शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी टास्क फोर्सचे पुनर्गठन | मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची विधानसभेत घोषणा

**नागपूर : प्रतिनिधी**

दुष्काळ, अतिवृष्टी, अवकाळी पाऊस, पूर, गारपीट अशा प्रत्येक नैसर्गिक आपत्तीत आमचे सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहिले आहे. गेल्या दीड वर्षांत आम्ही विविध योजनांच्या माध्यमातून बळीराजाला तब्बल ४४ हजार २७८ कोटींची आतापर्यंतची विक्रमी मदत केली असून शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी टास्क फोर्सचे पुनर्गठन करण्याचा, धान उत्पादक शेतकऱ्यांना यावर्षी प्रति हेक्टरी २० हजार रुपये बोनस देण्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोमवारी (दि. १८) विधानसभेत केली.



महाराष्ट्रात प्रथमच कांद्याची महाबँक स्थापन करण्यात आल्याचे जाहीर करतानाच छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेमध्ये ४४ लाख शेतकऱ्यांना १८ हजार ७६२ कोटी इतका कर्जमाफीचा लाभ देण्यात आला, मात्र सॉफ्टवेअरमध्ये त्रुटी निर्माण झाल्याने सहा लाख ५६ हजार शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहिले. ६.५६ लाख शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ देण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी सभागृहात केली.

कोकणातील विशिष्ट परिस्थिती व आव्हाने विचारात घेता या पूर्ण क्षेत्राचा एकत्रित विकास होण्यासाठी सर्व यंत्रणांच्या कामांमध्ये एकसुत्रता आणण्यासाठी कोकण क्षेत्र विकास प्राधिकरण स्थापन करण्याचा आमचा मानस आहे.

### महाराष्ट्रात प्रथमच कांद्याची महाबँक

महाराष्ट्रात प्रथमच कांद्याची महाबँक स्थापन केली आहे. या प्रकल्पाचा शुभारंभ करण्यात आला आहे. ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर हे यासाठी मदत करत आहेत. न्यूक्लिअर तंत्रज्ञानाचा वापर करून कांदा इरॅडिशनचा हा पथदर्शी प्रकल्प कांदा उत्पादकांच्या समस्येवर कायमस्वरुपी उपाय ठरेल, असा विश्वास व्यक्त करीत समृद्धी महामार्गालगत १३ कृषी समृद्धी केंद्रांच्या उभारणीचे काम सुरू असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. कांदा निर्यातबंदीबाबत केंद्रीय वाणिज्यमंत्री पियुष गोयल यांच्याशी चर्चा झाली असून याबाबतही लवकरच तोडगा निघेल, असेही त्यांनी सांगितले.

याकरिता यावर्षी पुरवणी मागण्यांमध्ये ५०० कोटी रुपयांची तरतूद ठेवण्यात आल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. या वेळी मुख्यमंत्र्यांनी राज्य शासनामार्फत शेती आणि शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांची माहिती दिली आणि त्यासाठी करण्यात आलेल्या निधींच्या तरतुदींची माहितीही त्यांनी दिली.

# मंत्री गिरीश महाजनांवर आरोप केल्याबद्दल माफी मागा!

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा विरोधकांवर पलटवार

**नागपूर : प्रतिनिधी**

उद्धव ठाकरे सभागृहात आले. त्यामुळे कदाचित मंत्री गिरीश महाजन आणि सलीम कुत्ता हा विषय पुढे आणला. आरोपाची खातरजमा न करता मंत्र्यांवर आरोप केले गेले. गिरीश महाजन यांच्यावर बेछुट आरोप केल्याबद्दल विरोधकांनी माफी मागितली पाहिजे. विरोधकांनी लावलेले आरोप पूर्णपणे खोटे आहेत, असे स्पष्टीकरण राज्याचे उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत दिले.



विधिमंडळाचे अधिवेशन सोमवारी (दि.१८) सुरू झाल्यानंतर विधान परिषदेत राष्ट्रवादीचे आमदार एकनाथ खडसे यांनी मंत्री गिरीश महाजन यांच्यावर दाऊदशी संबंध असल्याचा आरोप केला. त्याचसोबत सलीम कुत्तासोबत महाजन उपस्थित असल्याचा फोटो दाखवला. त्यावरून सभागृहात विरोधकांनी गोंधळ घातला. ठाकरे गटाचे अनिल परब आणि विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी या प्रकरणी मंत्री महाजन यांचा राजीनामा मागितला. या संपूर्ण प्रकरणावर उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात खुलासा करीत विरोधकांवर पलटवार केला.

उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, ज्या लग्नात गिरीश महाजन गेले होते तिथे सगळ्या पक्षाचे नेते, अधिकारी होते. ते लग्न नाशिकमधील मुस्लीम धर्माचे सर्वांत मोठे धर्मगुरू शहीरे खातिब यांच्या पुतण्याचे होते. त्या लग्नात पालकमंत्री म्हणून गिरीश महाजन गेले होते. शहीरे खातिब यांचा दाऊदशी कुठलाही संबंध नाही.

ज्या मुलीशी लग्न झाले तिच्या वडिलांच्या सासरमधील एक नातेवाईक दाऊदच्या कुठल्यातरी भावाशी लग्न झाले असा आरोप करण्यात आला होता, पण ज्यांच्याशी लग्न झाला त्यांचा कुठेही दाऊदशी संबंध नाही, कुठलाही आरोप नाही. कुठलाही गुन्हा दाऊदशी संबंधाचा नाही.

तथापि, ज्या वेळी अशा प्रकारचा आरोप माध्यमात झाला तेव्हा २०१७-१८मध्ये मी गृहमंत्री म्हणून चौकशी समिती नेमली होती आणि तत्कालीन डीसीपींच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने दिलेल्या अहवालात शहीरे खातिब यांचा दाऊदशी कुठलाही संबंध नाही असा रिपोर्ट दिला होता, असेही उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री फडणवीस यांनी स्पष्टपणे सांगितले.

# न्हावे विद्यालयातील विज्ञान प्रदर्शनामध्ये विविध प्रतिकृती



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या न्हावे येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये आंतरशालेय विज्ञान प्रदर्शन उत्साहात पार पडले.

न्हावे ग्रामपंचायत उपसरपंच राजेश म्हात्रे, माजी उपसरपंच हरेश म्हात्रे, ज्येष्ठ स्कुल कमिटी सदस्य किसन पाटील, मुख्याध्यापक रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्य प्रमोद कोळी, संस्थेचे लाईफ मेंबर रवीद्र भोईर, उपशिक्षक देवेंद्र म्हात्रे, पी. एम. ठाकूर, ठोंबरे मॅडम आदी या वेळी उपस्थित होते. या विज्ञान प्रदर्शनामध्ये विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली वैज्ञानिक प्रतिकृती तयार केल्या.

# सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयात पालक सभा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उलवे येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांची पालक सभा सोमवारी (दि. १८) झाली. शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष आयलेश म्हात्रे त्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेत बहुसंख्येने पालक उपस्थित होते.

विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती साधण्यासाठी पालकांचा सहभाग असावा, दहावीची बोर्ड परीक्षा जवळ आल्याने विद्यार्थ्यांनी अभ्यास कसा करावा आणि पालकांनी त्यांच्या अभ्यासाकडे लक्ष द्यावे अशा सूचना वर्गशिक्षिका एस. डी. पाटील यांनी पालकांना केल्या.विद्यालयाचे मुख्याध्यापक डी. जी. हजारे यांनी सत्र १ परीक्षेमध्ये विद्यार्थ्यांनी मिळविलेले प्रत्येक विषयाचे गुण पालकांच्या निदर्शनास आणून दिले.

पालकांनी विद्यार्थ्यांच्या अभ्यासाकडे जाणीवपूर्वक लक्ष देऊ, असे आश्वासन शिक्षकांना दिले. व्ही. व्ही. गावंड यांनीदेखील पालकांना व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.





# पात्र लाभार्थ्यांनी योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेचा गतिमानता पंधरवडा १७ ते ३० डिसेंबरपर्यंत रायगड जिल्ह्यात राबविण्यात येणार आहे. या अंतर्गत सर्व तालुक्यांमध्ये जनजागृती मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. पात्र लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक गुरुशांत हरळय्या यांनी केले आहे.

राज्याच्या नवीन औद्योगिक धोरण-२०१९ अंतर्गत अनेक नावीन्यपूर्ण योजना व कार्यक्रम महाराष्ट्र शासनाने हाती घेतले आहेत. या पंधरवड्यात रायगड जिल्ह्यातील महाविद्यालये, अभियांत्रिकी महाविद्यालये, औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे जनजागृती मेळाव्यातून प्रचार करण्यात येणार आहे, तसेच पात्र लाभार्थ्यांचे जागेवर अर्ज भरुन घेण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील कौशल्य उद्योजकता विकास विभाग, आरसेटी, एमसीईडी, मिटकॉन, इ. संस्थेद्वारे उद्योजकता विकास प्रशिक्षणाचा लाभ घेतलेल्या युवकांचे, जिल्ह्यातील औद्योगिक समुह विकास घटक, एक जिल्हा एक उत्पादन तसेच भौगोलिक मांनाकन प्राप्त उद्योजकांचे अर्ज प्राधान्याने या पंधरवाड्यात मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम अंतर्गत घेण्यात येणार आहेत. अधिक माहितीसाठी महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र येथे संपर्क साधावा, असे आवाहनही करण्यात आले आहे.

### दुखवटा — विठाबाई नाईक



**नवी मुंबई :** दिवाळे गावातील धवला गीतांची प्रसिद्ध गायिका विठाबाई नाईक (वय ९५) यांचे शनिवार (दि. १६) निधन झाले. त्यांच्या पश्चात मुले, मुली, जावई, सुना आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे. विठाबाई यांच्या पतीचे चार दिवसांपूर्वीच निधन झाले. नवी मुंबईसह, उरण पनवेलमधील पंचक्रोशितील अनेक गावात विठाबाई या धवला गीतांसाठी प्रसिद्ध होत्या. गेली ७० वर्षे त्यांनी ही परंपरा अखंडितपणे जोपासली होती.

# राज्यस्तरीय व जिल्हा वार्षिक योजना राबविण्यासाठी मुदतवाढ

**रायगड : रामप्रहर वृत्त**

क्षेत्रीय स्तरावर सध्या व्यापक प्रमाणावर सुरू असलेले वंध्यत्व निवारण शिबिरे इ. लक्षात घेता या योजनांमध्ये जास्तीत जास्त लाभार्थ्यांना अर्ज भरता यावे, यासाठी पशुसंवर्धन विभागामार्फत २०२३-२४ या वर्षासाठी ah.mahabms या प्रणालीवर राज्यस्तरीय नावीन्यपूर्ण व जिल्हा वार्षिक योजना राबविण्यासाठी ५ जानेवारी २०२४पर्यंत मुदतवाढ देण्यात आली, असल्याची माहिती जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. सचिन देशपांडे यांनी दिली आहे.

सन २०२३-२४ या वर्षासाठी ah.mahabms या प्रणालीवर राज्यस्तरीय नावीन्यपूर्ण व जिल्हा वार्षिक योजना राबविण्यासाठी वेळापत्रक निश्चित करण्यात आले होते. या वेळापत्रकानुसार सन २०२३-२४साठी ऑनलाईन अर्ज स्वीकारणे व जुने लाभार्थीमार्फत कागदपत्रे अपलोड करणे आणि जिल्हा स्तरावर कागदपत्रे पडताळणी करून पडताळणी करून निवड पूर्ण करणे याची मुदत १५ डिसेंबर रोजी संपुष्टात आली आहे.

नवीन वेळापत्रकाप्रमाणे जुने लाभार्थीमार्फत कागदपत्रे अपलोड करणे आणि जिल्हा स्तरावर कागदपत्रे पडताळणी करून निवड पूर्ण करणे, यासाठी एकूण कालावधी ४० दिवस, १९ व २० डिसेंबर डाटा बॅकअप करणे, २१ ते २३ डिसेंबर सन २०२३-२४ च्या लाभार्थ्यांची रॅंडमायझेशन पद्धतीने प्राथमिक यादी तयार करणे, २४ डिसेंबर राखीव, २५ डिसेंबर ते ५ जानेवारी २०२४, सन २०२३-२४मधील नवीन प्राप्त अर्जांच्या अनुषंगाने जिल्हा स्तरावर कागदपत्रे पडताळणी करुन निवड पूर्ण करणे, ६ ते ८ जानेवारी २०२४, सर्व लाभार्थी मार्फत कागदपत्रातील त्रुटी पूर्तता, ९ जानेवारी २०२४ कागदपत्रे अंतिम पडताळणी, १० जानेवारी २०२४ पात्र अंतिम लाभार्थी यादी तयार करणे असा असणार आहे.

## पान १ वरुन

### ‘दिबां’च्या नावाचा ठराव अंतिम टप्प्यात

केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांनी सांगितले की, दि.बा.पाटील यांचे नाव विमानतळाला द्यावे यासाठी उभारलेल्या लढ्यामुळे आपला सारा आगरी समाज एक झाला आणि त्यांनी लाखोंच्या संख्येने दिलेल्या लढ्याची दखल राज्य सरकारला घ्यावी लागली हा या लढ्याचा मोठा विजय आहे. राज्य सरकारने केंद्राकडे पाठवलेला ठराव आता मंजुरीच्या अंतिम टप्प्यात आहे. त्यामुळे त्याच्यासाठी पुन्हा आंदोलन करण्याची आपल्याला गरज भासणार नाही.

एका प्रश्नाच्या उत्तरात ना. पाटील म्हणाले की, ज्यांना याची शाश्वती नसेल त्यांना मी माझ्या खर्चाने दिल्लीला नेतो व त्यांनी संबंधितांकडून माहितीची खात्री करून घ्यावी तसेच हा नावाचा प्रश्न निवडणुकीपूर्वी सुटला तर बरेच होईल, पण ते विमानतळाच्या कामावर अवलंबून आहे, असेही त्यांनी नमूद केले.

नवी दिल्ली येथील विमानतळावर एका केंद्रीय मंत्र्याबरोबर भाषा विषयावर चर्चा करीत असताना त्यांनी माझी मातृभाषा विचारली. मी मराठी सांगितली. त्यांनी पूर्वी आधी घरातील भाषा विचारली. मी आगरी बोललो. त्यावर ते म्हणाले, ही भाषा घरात सर्वांना येते का? नव्या पिढीला ती येत नसल्याचे सांगितले. त्यावर ते म्हणाले की अशा पद्धतीने आपली भाषा लोप पावते, असे सांगून ना. पाटील म्हणाले की, खरी आगरी भाषा गावागावात बोलली जाते. तिचे संवर्धन करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न केले पाहिजेत.

प्रारंभी दशरथ पाटील यांनी दि.बा.पाटील यांचा जीवनप्रवास कथन करून त्यांच्या कार्याची माहिती दिली.

### संसदेत पुन्हा गदारोळ; ६७ विरोधी खासदार निलंबित

राज्यसभेतून निलंबित करण्यात आलेल्या खासदारांमध्ये प्रमोद तिवारी, जयराम रमेश, अमी याज्ञिक, नारायण भाई राठवा, शक्ती सिंह गोहिल, रजनी पाटील, सुखेंदू शेखर, नदीमुल हक, एन. षणमुघम, नासिर हुसेन, फुलो देवी नेतान, इम्राम प्रतापगढ़ी, रणदीप सुरजेवाला, मौसम नूर, समीरुल इस्लाम, रणजीत रंजन, फैयाज अहमद, मनोज झा, रामनाथ ठाकूर, अनिल हेगडे, वंदना चव्हाण, रामगोपाल यादव, जावेद अली खान, जोस के मणी, महुआ मांझी, अजित कुमार आदी खासदारांचा समावेश आहे. याआधीही लोकसभेतील १२ विरोधी खासदारांना हिवाळी अधिवेशनाच्या उर्वरित दिवसांसाठी निलंबित करण्यात आले होते. अशा प्रकारे आतापर्यंत एकूण ८१ खासदारांवर कारवाई झाली आहे.

### अमरावतीमध्ये एनआयएचा छापा; तरुण ताब्यात


**अमरावती :** जिल्ह्यातील अचलपूर येथे सोमवारी (दि.१८) एनआयए अर्थात राष्ट्रीय तपास यंत्रणेच्या पथकांनी महाविद्यालयात शिकणाऱ्या एका शिक्षकाच्या मुलाला चौकशी करण्यासाठी ताब्यात घेतले.

संबंधित शिक्षकाचा मुलगा हा नागपूर येथील एका महाविद्यालयात शिक्षण घेत होता. अनेकदा तो घरी येत असे. मागील काही दिवसांपासून तपास यंत्रणा त्याच्या कारवायांवर लक्ष ठेवून होती.

# आरक्षणासाठी कळंबोलीत धनगर समाज एकवटला

**कळंबोली : बातमीदार**

धनगर समाजाचा समावेश अनुसूचित जमातीच्या संवर्गात करून त्याची त्वरित अंमलबजावणी शासनाने करावी यासाठी नवी मुंबई येथील सकल धनगर समाजाच्या वतीने शांतता मार्गाने कामोठे कळंबोली येथे आंदोलन करण्यात आले. या वेळी कळंबोली मायक्का मंदिर ते कामोठे मायक्का मंदिर अशी पदयात्रा काढण्यात आली होती.



धनगर समाजाची एसटी आरक्षणाच्या अंमलबजावणीची मागणी करण्यात आलेली आहे. धनगर समाजाचे नेते अधिवेशनामध्ये आरक्षण अंमलबजावणीची मागणी करीत आहेत. कळंबोली येथील आंदोलनावेळी मुंबई नवी, पनवेल, कळंबोली, कामोठे परिसरातील सर्वपक्षीय कार्यकर्ते उपस्थित होते. भाजप ज्येष्ठ नेते रावसाहेब बुधे, अशोक मोटे, महादेव अर्जुन, युवा नेते तुकाराम सरक, नानासाहेब मगदूम, अध्यक्ष गणेश बेरगळ उपाध्यक्ष पांडुरंग यमगर, ज्येष्ठ नेते शिवाजी मुढे, रामा महानवर, सुदाम जरक, उत्तम जरक, साहेबराव खरात, ज्येष्ठ नेते प्रल्हाद जानकर, समाधान बढगर, नानासाहेब बुधे, एन. बी. खताळ, सुकदेव खांडेकर, आनासाहेब पडळकर, विद्या तामखडे, गणेश बेरगळ यांच्यासह तरुण मंडळी मोठ्या संख्येने मोर्चामध्ये सहभागी झाले होते.

**आमदार प्रशांत ठाकूरसाहेब नेहमी धनगर समाजाच्या पाठीमागे ठाम उभे असतात आणि त्यांच्यामुळे धनगर समाजाला या पनवेल परिसरात न्याय मिळत असतो. त्यांच्यासह लोकनेते रामशेठ ठाकूरसाहेब यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही सर्वजण एकजुटीने काम करू.**
**-रावसाहेब बुधे, भाजप ज्येष्ठ नेते**


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, मौजे चिंचवली शेकीन, ता. खालापुर, जि. रायगड, महाराष्ट्र राज्य येथील १) प्रमोद विठ्ठल जाधव, २) अनिता विठ्ठल जाधव यांच्या मालकी हक्काची व ताबेकब्जातील खालील वर्णन केलेली जमिन मिळकत आमचे अशिल हे नोंदणीकृत खरेदीखताने विकत घेण्याच्या विचारात आहेत.

**मिळकतीचे वर्णन :**
मौजे चिंचवली शेकीन, ता. खालापुर, जि. रायगड

| गट क्र. | भुखंड क्र. | सीटीएस नं. | बिनशेती क्षेत्रफळ | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| ४० | १ | १११३ | ७९.९० चौ.मी. पैकी ४०० चौ.मी. | ७०३१.२० |

तरी सदरहु जागा, जमिन मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकरचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, विकासनकरार, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, संपादन, भाडेपट्टा, साठेकरार, लिज, तबदील, ट्रस्ट, मृत्युपत्र, विक्रीचा करार, वारसा या प्रकारचा अगर अन्य कोणत्याही व कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास संबंधितांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी, ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन पंधरा (१५) दिवसांच्या आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्यावर, सक्षम वा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे विहित मुदतीत कोणत्याही प्रकारच्या हरकती दाखल न झाल्यास वरील मिळकती या निर्वेध व बोजाविरहित आहेत व हरकत असल्यास ती सोडुन दिली आहे असे गृहित धरून आमचे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतीस आमचे आशिल हे कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाहीत, याची कृपया नोंद घेण्यात यावी.

दिनांक : १९.१२.२०२३

सही/-
**अॅड. मनीषा पवार**
**पत्ता : २०१, प्रॉक्सीमा बिल्डींग, सेक्टर ३०अ, प्लॉट नं. १९, वाशी, नवी मुंबई, मोबाईल : ८०८०८१९३१६**

# बँकांनी 'प्रधानमंत्री स्वनिधी'च्या पथविक्रेत्यांना कर्जपुरवठा करावा

## पनवेल महापालिकेकडून सूचना

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्रधानमंत्री स्वनिधी योजनेंतर्गत पंतप्रधान पथविक्रेता आत्मनिर्भर निधी योजनाची अंमलबजावणी आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिकेच्या वतीने करण्यात येत आहे. या योजनेंतर्गत रुपये दहा हजारांचे पथविक्रेत्यांना खेळते भांडवल कर्ज स्वरूपात उपलब्ध करून देण्यात येत आहे. हे कर्ज वेळेत किंवा वेळेच्या आधी फेडल्यास पथविक्रेत्यांना २० हजार व त्यानंतर ५० हजार कर्ज उपलब्ध करून देण्यात येत आहे.

महापालिका कार्यक्षेत्रातील विविध बँका महापालिकेला प्रधानमंत्री स्वनिधी योजना राबविण्यास उत्तम सहकार्य करत आहेत. यापुढेही संबधित बँकांनी प्रधानमंत्री स्वनिधी योजनेंतर्गत आलेल्या अर्जदारांना कर्ज वाटप करून सहकार्य करावे, तसेच याबाबतीत काही अडचणी येत असल्यास महापालिकेच्या अधिकाऱ्यांची मदत घ्यावी, अशा सूचना उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांनी उपस्थितांना दिल्या.

महापालिकेच्या दीनदयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान (डेएनयुलएम) विभागाच्यावतीने सर्व बँक प्रतिनिधींची बैठक सोमवारी (दि. १८) मुख्यालयात आयोजित



करण्यात आली होती. या वेळी ते बोलत होते. दीनदयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानाचे व्यवस्थापक विनया म्हात्रे, नवनाथ थोरात, विविध बँकाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

पंतप्रधान पथविक्रेता आत्मनिर्भर निधी योजनेंतर्गत महापालिकेने आत्तापर्यंत आठ हजार ३६७ पथविक्रेत्येंना कर्ज वितरीत केले आहे. जी प्रकरणे बँकांनी मंजूर केली आहेत परंतू कर्ज वितरीत केले नाहीत अशा पथविक्रेत्यांना बँकांनी तातडीने कर्ज वितरीत करावीत तसेच कर्जासाठी अर्ज केलेल्या पथविक्रेत्यांची प्रकरणे मंजूर करावीत अशा सूचना या वेळी उपायुक्त विधाते यांनी उपस्थित बँक प्रतिनिधींना दिल्या. तसेच जी प्रकरणे पेडिंग आहेत त्यांची माहिती महापलिकेला देऊन सहकार्य करण्याविषयी सूचित केले.

या योजनेंतर्गत पनवेल महापालिकेच्या वतीने महापालिका क्षेत्रातील पथविक्रेत्यांना कर्ज मिळवून देण्यासाठी सहकार्य केले जात आहे. पनवेल महापालिका कार्यक्षेत्रातील पथविक्रेत्यांना व्यवसायाकरीता केंद्र शासन पुरस्कृत पंतप्रधान पथविक्रेता आत्मनिर्भर निधी योजने अंतर्गत पथविक्रत्यांना एक वर्षाच्या परतफेड मुदतीसह रूपये दहा हजार पर्यंतचे खेळते भांडवल उपलब्ध करून देण्यात आले आहे. हे कर्ज विनातारण असून या कर्जाची रक्कम वेळेवर किंवा वेळेआधी परतफेड केल्यास पथविक्रेत्येंना अनुक्रमे रूपये वीस हजार व त्यानंतर ५० हजाराचे कर्ज उपलब्ध करून देण्यात येत आहे.

### लाभ घेण्याबाबत आवाहन

जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत प्रधानमंत्री स्वनिधी या योजनेचा लाभ देण्यासाठी पनवेल महापालिकेच्या प्रभाग समिती कार्यालयात महापालिकेमार्फत अर्ज भरण्याकरिता सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. प्रभाग कार्यालयामध्ये या योजनेचा लाभ मिळविण्यासाठी प्रभाग अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा तसेच अधिक माहितीसाठी महापालिकेच्या आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहामधील राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान कक्षातील कर्मचाऱ्यांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### आवश्यक कागदपत्रे

१) आधार कार्ड
२) बँक पासबुक
३) मोबाईल नं. आधारकार्ड नंबरला लिंक पाहिजे
४) रेशन कार्ड
५) पासपोर्ट साईज फोटो
६) बाजार फी वसुली पावती
७) मतदान कार्ड

# अनधिकृत बांधकाम हटवून वृक्षारोपण

**खारघर : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या माजी नगरसेविका नेत्रा पाटील व सामाजिक कार्यकर्ते किरण पाटील यांच्या पुढाकारामुळे खारघर सेक्टर १९ येथील अनाधिकृत बांधकाम हटविण्यात आले आहे. तसेच या जागी वृक्ष लागवड करण्यात आली.

खारघर सेक्टर १९ येथील काही सोसायटीच्या मागील आरक्षित असलेल्या ट्री बेल्टवर काही समाजकंटकांकडून अनाधिकृतपणे जागा हडपण्याचा प्रयत्न केला जात होता. राज रेसिडेन्सी, पूजा रेसिडेन्सी व रीजन्सी क्रिस्ट सोसायटीतील जागरूक रहिवाशांनी तत्काळ ती बाब माजी नगरसेविका नेत्रा पाटील व सामाजिक कार्यकर्ते किरण पाटील यांच्या निदर्शनास आणून दिली. आम्ही तत्काळ ठिकाणी पोहचलो व ती बाब पनवेल महापालिका प्रशासनाच्या अधिकाऱ्यांना तसेच खारघर प्रभाग अधिकारी जितेंद्र मढवी

**खारघरमध्ये पाटील दाम्पत्याचा पुढाकार**



यांच्या निदर्शनास आणून दिली. त्यांनी तत्काळ त्या ठिकाणी महापालिकेचे अतिक्रमण विभागाचे कर्मचारी पाठवून ते अनाधिकृत बांधकाम हटवले. त्या रात्री राज रेसिडेन्सी पूजा रेसिडेन्सी व रेजन्सी क्रिस्ट या सोसायटीतील महिला तसेच रहिवाशी मोठ्या प्रमाणात खाली उतरले होते सर्वांच्या एकजुटीने व प्रशासनाच्या सहकार्याने त्या ठिकाणी अनधिकृत होणारे बांधकाम थांबवता आले.

रविवारी (दि. १७) या ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले व वृक्ष संगोपनाची जबाबदारीदेखील सोसायटीतील रहिवाशांनी घेतली. खारघर शहरातील अशा बऱ्याच ठिकाणी होणारे अनधिकृतपणा अतिक्रमण अथवा जागा अडकण्याचे प्रकार हे सिडको व पनवेल महापालिका प्रशासनाने जागरूकतेने हाताळावेत व वेळीच अशा समाजकंटकांना रोखावे ही खारघरमधील रहिवाशांची मागणी आहे.

**कळंबोली : सेक्टर ११मधील गुरुकुटीर सोसायटीच्या बाहेरच्या बाजूला एक जीर्ण झालेल्या मोठा वृक्ष अत्यंत धोकादायक झाला होता. तेथील कालिकामाता मंदिराचे अध्यक्ष मुजूमदार यांनी ही बाब भाजप शहर अध्यक्ष रविनाथ पाटील यांच्या निदर्शनास आणून दिली होती. त्यानुसार महापालिकेच्या माध्यमातून धोकादायक वृक्ष सुरक्षितपणे पाडण्यात आला.**



## निवडक

### दागिने खेचून दोघे पसार

**पनवेल :** गावदेवी मंदिराजवळ एका महिलेच्या गळ्यातील सोन्याच्या मंगळसूत्रासह दागिने खेचून दोघेजण दुचाकीवरून पसार झाल्याची घटना घडली आहे. सुप्रिया टेंबे (वय ५४) या तेथून जात असताना मोटरसायकलवरून आलेल्या दोन अनोळखी व्यक्तीपैकी पाठीमागे बसलेल्या एकाने त्यांच्या गळ्यातील सोन्याच्या मंगळसूत्रासह इतर दागिने असा मिळून जवळपास एका लाख वीस हजार किमतीचा ऐवज खेचला व दोघे पसार झाले. या घटनेची नोंद शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### कंटेनर केबिनमध्ये चोरी

**पनवेल :** कंटेनर केबिनचे लॉक तोडून चोरट्याने येथून चार लाख पाच हजार रुपये चोरून नेल्याची घटना तळोजा परिसरात घडली आहे. भरत विश्वकर्मा त्यांचे ट्रक रेफ्रिजरेशन पॉइंट नावाचे नावडा फाटा येथे ट्रक गॅरेज आहे. यांच्याकडे अशोक लेलँड कंपनीचा ट्रक होता. त्यांनी तो दहिसर मोरीच्या भंगारवाल्याला विकला. त्यांनी त्याचे पैसे गॅरेजच्या कंटेनर केबिनमध्ये ठेवले होते. त्यानंतर भरत विश्वकर्मा केबिनला लॉक करून तळोजा एमआयडीसी येथील आरके मोटर गॅरेजमधील हंसराज यांच्याकडे कामासाठी गेले होते. तेथून ते परत आले असता त्यांना केबिनचे कुलूप तुटलेले दिसले. त्यांनी ते उघडून पाहिले असता त्यातील रक्कम चोरीला गेल्याचे आढळले. याबाबत त्यांनी तळोजा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

### स्टेशन परिसरात आढळला मृतदेह

**पनवेल :** खारघर रेल्वे स्टेशन ते मानसरोवर रेल्वे स्टेशनदरम्यान एका व्यक्तीचा मृतदेह आढळला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल रेल्वे पोलीस करीत आहेत. खारघर रेल्वे स्टेशन ते मानसरोवर रेल्वे स्टेशन दरम्यान एका अज्ञात व्यक्तीला लोकल गाडीची ठोकर बसून त्यात तो मयत झाला आहे. मयत व्यक्तीचे अंदाजे वय ५० वर्ष, अंगाने सडपातळ, रंग निमगोरा, चेहरा उभट, नाक सरळ, केस काळे व पांढरे, दाढी वाढलेली असून उजव्या हातावर मराठीत शंकर असे गोंदलेले तसेच उजव्या छातीच्या बाजूस साई असे गोंदलेले आहे. त्याच्या अंगात लाल टीशर्ट तसेच राखाडी बर्मोडा घातलेला आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्याने पनवेल रेल्वे पोलीस ठाणे (०२२ -२२२७४६७१२२) किंवा सहा पोलीस निरीक्षक पी.एम. कांबळे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### जुगारप्रकरणी पोलिसांची कारवाई

**पनवेल :** कल्याण बाजार जुगार मोबाईल फोनद्वारे चालवत असल्या प्रकरणी दोघांविरुद्ध खांदेश्वर पोलिसांनी कारवाई केली आहे. सिडको टेकडी गार्डन ए टाईप वसाहत, सेक्टर १३, नवीन पनवेल येथे काही जण मोबाईल फोनद्वारे कल्याण बाजार जुगार चालवत असल्याची माहिती पोलिसांनी मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी या ठिकाणी छापा मारला असता तेथे अकबर महामुद जोगीलकर (मुस्लिम नाका, पनवेल) व संदीप सिंग हे दोघे मोबाईल फोनच्या सहाय्याने ग्राहकाकडून पैसे घेऊन कल्याण बाजार जुगार चालवत असल्याचे आढळले. त्यावर पोलिसांनी त्यांच्याविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

### वैश्य वाणी समाजाचा वधू-वर मेळावा

**नवीन पनवेल :** कै. यशवंत दगडूशेठ फके यांच्या स्मृती प्रित्यर्थ रायगड जिल्हा वैश्य समाज संघ व पनवेल तालुका वैश्य समाज मंडळ आयोजित वधू-वर परिचय मेळावा २०२३ चे आयोजन रविवार २४ डिसेंबर रोजी सकाळी दहा ते सहा वाजेपर्यंत जेष्ठ नागरिक सभागृह, ठाणा नाका रोड, पनवेल येथे आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले असून या वधू-वर मेळाव्याला प्रवेश विनामूल्य आहे.

# पनवेलमध्ये शास्त्रीय संगीत महोत्सव



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

संगीत भूषण पंडित राम मराठे फाउंडेशन आणि श्री. रामशेठ सामाजिक विकास मंडळ, पनवेल व नादब्रम्ह साधना मंडळ, खारघर यांच्या संयुक्त विद्यमाने पंडित राम मराठे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त शास्त्रीय संगीत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

या महोत्सवाचे आयोजन पनवेल शहरातील मार्केट यार्ड येथील श्री. रामशेठ सामाजिक विकास मंडळ सभागृह येथे करण्यात आले होते. या महोत्सवाचे उद्‌घाटन भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते रविवारी (दि. १७) करण्यात आले.

या कार्यक्रमाला हभप धंनजय जोशी, डॉ. राम नेने, राजेंद्र मनेनीकर, निवृत्ती बुवा चौधरी, संजय मराठे, मृणाल नाटेकर, नंदकुमार कर्वे, वसंत पाटील, मोतीराम कडू, कृष्णा पवार, उमेश चौधरी, श्रुती पाटील, संतोष पाटील, जितेंद्र म्हात्रे, निवेदक मच्छींद्र पाटील आदी उपस्थित होते.



**पनवेल : मधुकर म्हात्रे यांच्या कोळखे येथील गोल्ड डिगर या हॉटेलच्या उद्‌घाटनानिमित्त श्री सत्यनाराणाची महापुजा आयोजित करण्यात आली होती. या वेळी माजी पंचायत समिती सदस्य रत्नप्रभा घरत यांनी सहकुटूंब या पूजेचे दर्शन घेतले. या वेळी अरुण घरत, अंकित घरत, मयूर म्हात्रे, विशाखा म्हात्रे, मालिनी म्हात्रे, तेजस्विनी म्हात्रे, तुकाराम म्हात्रे, तन्मयी म्हात्रे आदी उपस्थित होते.**

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयाच्या विशेष श्रमसंस्कार शिबिराचा समारोप

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे शांतीवन नेरे आयोजित सात दिवसीय विशेष श्रमसंस्कार निवासी शिबिराचा समारोप सोमवारी (दि. १८) झाला.

या समारोप समारंभासाठी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, कार्यकारी सदस्य संजय पाटील तसेच संस्थेचे सचिव डॉ. सिद्धेश्वर गडदे, प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड या सर्वांनी समारोप समारंभासाठी उपस्थित राहून रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयातील तसेच चांगू काना ठाकूर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवकांना तसेच कार्यक्रम अधिकाऱ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले तसेच त्यांनी या सात दिवशीय विशेष श्रमसंस्कार शिबिरामध्ये उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल त्या सर्वांचे सत्कार व अभिनंदन केले.

या सात दिवशी विशेष श्रमसंस्कार शिबिराचा अहवाल प्रा. डॉ. सूर्यकांत परकाले (मुख्य कार्यक्रमाधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना विभाग चांगू काना ठाकूर महाविद्यालय पनवेल) यांनी सादर केला तसेच त्यांनी अहवालामध्ये या सात दिवसांमध्ये राष्ट्रीय सेवा विभागातर्फे वेगवेगळी बौद्धिक सत्रे तसेच श्रमदान, स्वच्छता रॅली, नदीवर बंधारा बांधण्याचे काम या सर्व कामांचा उल्लेख केला. रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतील सर्व कार्यक्रमाधिकारी, प्रा. डॉ. महादेव चव्हाण, प्रा. राहुल कांबळे, प्रा. प्रतीक्षा पाटील, प्रा. राजश्री म्हात्रे , प्रा. करिष्मा कडव तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी व राष्ट्रीय स्वयंसेवकानी या सात दिवसीय विशेष श्रम संस्कार निवासी शिबिरामध्ये सात दिवस उपस्थित राहून सहकार्य केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. आकाश पाटील कार्यक्रम अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना विभाग चांगू काना ठाकूर महाविद्यालय पनवेल यांनी केले तसेच प्रा. प्रथमेश ठाकूर समन्वयक राष्ट्रीय सेवा योजना विभाग, रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालय यांनी कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांचे आभार मानले.



# सीकेटी विद्यालयात विद्यार्थ्यांसह शिक्षकांसाठी विविध स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्वर्गीय जनार्दन भगत साहेब यांच्या ९६व्या जयंतीनिमित्त नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयात सोमवारी (दि. १८) विद्यार्थ्यांसाठी अंतर महाविद्यालयीन भरतनाट्यम स्पर्धा तर शिक्षकांसाठी अंतर महाविद्यालयीन निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमासाठी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे संचालक संजय भगत हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच पनवेल महापालिकेच्या माजी नगरसेविका ॲड. वृषाली वाघमारे, मराठी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक कैलास सत्रे, इंग्रजी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक





संतोष चव्हाण, मराठी प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर, इंग्रजी पूर्व प्राथमिक आणि प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे, मराठी माध्यमिक विभागाचे पर्यवेक्षक कैलास म्हात्रे, इंग्रजी पूर्व प्राथमिक विभागाच्या पर्यवेक्षिका वैशाली पारधी, उच्च माध्यमिक विभागाचे प्राचार्य प्रशांत मोरे, कला व वाणिज्य विभागाचे पर्यवेक्षक अजित सोनवणे, विज्ञान विभागाच्या पर्यवेक्षिका स्वाती पाटील, तसेच विद्यार्थी, शिक्षक व चतुर्थश्रेणी कर्मचारी या सर्वांची उपस्थिती या कार्यक्रमासाठी लाभली होती.

आंतरमहाविद्यालयीन भरतनाट्यम स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून वैशाली पवार व शिवानी पाचोरकर यांनी काम पाहिले. भरतनाट्यम स्पर्धेतून सई जोशी हिने प्रथम क्रमांक प्राप्त केला. पंक्ती शहा हिने द्वितीय क्रमांक प्राप्त केला तर ऋतुजा कांबळे हिने तृतीय क्रमांक प्राप्त केला. आंतर महाविद्यालयीन शिक्षक निबंध स्पर्धेसाठी सीकेटी सीनियर कॉलेजचे प्रा. डॉ. आर. बी. येवले, डॉ. गीतिका चव्हाण, प्रा. एम. एन. अंबुलगेकर, यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. शिक्षकांच्या निबंध स्पर्धेतून राजेंद्र गांगरे यांनी प्रथम क्रमांक प्राप्त केला. दुर्गादेवी मौया यांनी द्वितीय क्रमांक प्राप्त केला, तर प्रिया वंजे यांनी तृतीय क्रमांक प्राप्त केला.

या यशाबद्दल संस्थेचे लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस. टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, पर्यवेक्षिका स्वाती पाटील आदींनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## संपादकीय

# अस्तित्वाची लढाई सुरू

आगामी लोकसभा निवडणुकांसाठीची लिटमस टेस्ट वा सेमी फायनल मानल्या गेलेल्या पाच राज्यांमधील विधानसभा निवडणुकांचे निकाल उत्तर भारतातील किमान तीन महत्त्वाच्या राज्यांमध्ये भारतीय जनता पक्षाची पकड किती मजबूत आहे ते स्पष्ट करून गेले. राजस्थान आणि छत्तीसगडमधील सत्ता गमावल्यानंतर हबकलेला काँग्रेस पक्ष आता हळूहळू त्या धक्क्यातून सावरण्याचा प्रयत्न करतो आहे. तसे करण्यावाचून काँग्रेस पक्षाला किंवा अन्य विरोधीपक्षांना गत्यंतरही नाही.

**लोकसभेसाठीच्या निवडणुका नव्या वर्षात होतीलच आणि त्यासाठी भारतीय जनता पक्षाने चांगलेच दमदार आव्हान आतापासूनच उभे केले आहे. कर्नाटकातील विधानसभा निवडणुकीत मिळालेल्या विजयानंतर काहीसा जोश संचारलेला काँग्रेस पक्ष राजस्थान, मध्य प्रदेश व छत्तीसगडमधील भाजपच्या दणदणीत विजयानंतर पार खचला हे लपून राहिलेले नाही, पण पुन्हा एकदा अस्तित्व टिकवण्यासाठी कंबर कसण्यावाचून त्यांना गत्यंतरही नाही. त्यामुळे पराभवातून आलेले नैराश्य लपवण्याचा आटोकाट प्रयत्न करत काँग्रेस पक्षाने लोकसभा निवडणुकीच्या दृष्टीने हालचाली सुरू केल्या आहेत. देशाच्या लोकशाहीच्या दृष्टीने ते आवश्यक असल्याने त्याचे स्वागतच करायला हवे. आगामी निवडणुकांची तयारी करण्याच्या दृष्टीने काँग्रेस पक्षाने ‘देशासाठी दान’ नावाच्या निधी संकलन मोहीमेची घोषणा केली असून यात काँग्रेस पक्ष लोकांकडून ऑनलाईन देणगी घेणार आहे. आपल्या या ऑनलाईन निधी संकलन मोहिमेचा उद्देश पक्ष मजबूत करण्याचा असल्याचे सांगत या मोहिमेसाठी पक्षाने महात्मा गांधी यांच्या ऐतिहासिक टिळक स्वराज निधीपासून प्रेरणा घेतल्याचा दावा काँग्रेसने केला आहे. अर्थातच भारतीय जनता पक्षाने त्यांच्या या दाव्याची चांगलीच खिल्ली उडवली असून पक्षाच्या खासदाराला पैसे लुटताना पकडल्यानंतर काँग्रेस पक्षाने डोनेट फॉर डायनेस्टी अर्थात वंशावळ टिकवण्यासाठी निधी संकलन मोहीम हाती घेतल्याची टीका भाजपने केली आहे. काँग्रेस पक्षाचे राज्यसभा खासदार धीरज साहू यांच्याकडे ३५३ कोटी रुपयांची लपवलेली रोकड सापडल्यानंतर भाजपने काँग्रेसला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न करणे स्वाभाविकच आहे. तर काँग्रेस पक्षाला साहू यांच्याकडे सापडलेल्या रकमेशी पक्षाचा काहीही संबंध नाही असा खुलासा करण्याची वेळ आली आहे. देशासाठी दान मोहिमेंतर्गत काँग्रेस पक्षाने लोकांना पक्षाला १३८, १३८० किंवा १३८०० वा तशाच प्रकारे आणखी मोठ्या रकमा दान करण्याचे आवाहन केले आहे. काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते म्हणे घरोघरी जाऊन लोकांकडून दान मागणार आहेत. आपल्या या निधी संकलन मोहिमेला थेट महात्मा गांधी यांच्या ऐतिहासिक टिळक स्वराज फंडाशी जोडण्याचा काँग्रेसचा प्रयत्न म्हणजे लोकांची शुद्ध फसवणूक आहे. यातून महात्मा गांधी व टिळक या दोन्ही थोर नेत्यांच्या प्रतिमा मलीन होतील, अशी टीका भाजपने केली आहे. निधी संकलनासाठी ही शक्कल लढवण्यापाठोपाठच काँग्रेसने ‘इंडिया’ आघाडीच्या बैठकीसाठीही अखेर पुढाकार घेतला आहे. पाच राज्यांमधील विधानसभा निवडणुकांचे वेळी भलताच जोश संचारल्याने काँग्रेसने इंडिया आघाडीकडे पाठ फिरवली होती. निकालांमध्ये फटका बसल्यानंतर मात्र काँग्रेसला अखेर वास्तवाचे भान आले असावे. पाटणा, बंगळुरू व मुंबईतील बैठकांनंतर गेले तब्बल साडेतीन महिने इंडिया आघाडीची बैठक झालेली नाही. ती आता मंगळवारी बोलावण्याकरिता काँग्रेसनेच पुढाकार घेतला आहे. या बैठकीला किती पक्षांचे नेते उपस्थित राहतात आणि जागावाटपाचा तिढा सोडवण्यात इंडिया आघाडीला कितपत यश येते हे येणाऱ्या काळात दिसेलच.**

# किल्ले रायगड मार्गावरील लाडवली पुलाला निरोप



**खबरबात**
**महेश शिंदे**

महाड तालुक्यात अनेक ऐतिहासिक व पुरातन वास्तू आहेत. समाजिक समतेचा लढा दिलेल्या आठवणी आहेत, तर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेला किल्ले रायगड व त्याचा परिसर आहे. याच स्वराज्याच्या राजधानीला जगापासून जोडून ठेवणारा आणि गेली ५० वर्षे अविरत शिवभक्तांची सेवा करणारा लाडवली येथील पूलही तितकाच महत्त्वाचा आहे. नव्याने होऊ घातलेल्या महामार्गामुळे लाडवली पुल आता पाडला जाणार आहे व त्या जागी भव्य मोठा पूल उभारला जाणार आहे. रायगडवासीयांचे भावनिक नाते असलेला हा पूल शेवटच्या दिवसात त्याची गाथा व आठवणी सांगत आहे.

नवनिर्माण हा सृष्टीचा नियम आहे, मात्र तरीदेखील आपले जुन्या गोष्टी आणि वस्तूंशी एक वेगळीच जवळीक आणि ऋणानुबंध असतात. असेच ऋणानुबंध महाड रायगड मार्गावरी लाडवली या पुलाशी आहेत. गेली पन्नास वर्षे हा पुल अनेक घटना, पूर, वादळे, संकटे, मेळावे, उत्सव पाहात आला आहे. जशा आनंदायी घटना पाहिल्या तशा दुःखी घटनाही जाणल्या. लाखो कोट्यवधी शिवभक्तांना रायगडाची भेट घालून दिली. शिवराज्याभिषेक असुदे की शिवपुण्यतीथी, या साठी झालेले सोहळे आणि त्याची सेवा बजावताना कधीच अभिमान बाळगला नाही. सर्वसामान्य शेतकरी, कष्टकरी कामगार यांच्या गाड्या बैलगाड्यांची वाहतूक याच पुलाने करविली, तिथेच पंतप्रधान, राष्ट्रपती, मुख्यमंत्री आणि मंत्र्यांच्या व्हीआयपी गाड्यांची बडदास्तही सोसली, मात्र कधीच तक्रारीचा एकही सुर काढला नाही.

या पुलाने २००५, २०१९ आणि २०२१ च्या महापूराची धडक सोसली. अंगावरून आठ ते दहाफूट पाणी जाऊनही किंचीत ही डगमगला नाही. बांधकामातला कोणताही दगड ढासळू दिला नाही. ही प्रेरणा बहुदा त्याने छत्रपती शिवाजी महाराजांपासूनच घेतली असावी. ज्या प्रकारे शिवरायांनी मौल्यवान एकेक मावळा स्वराज्याच्या माळेत विणला होता त्याला कधीच निखळू दिले नाही, त्या धर्तीवर या पुलाने एकेक दगड आपल्या उराशी घट्ट धरून ठेवला होता. या पन्नास वर्षांत या पुलची कधीच दुरुस्ती करायची वेळ आली नाही...नव्हे तर तशी वेळच या पुलाने कधीच येऊ दिली नाही! पूर आला की लोक याच पुलावर पाण्याचा अंदाज व पूराची मजा अनुभवण्यासाठी यायचे, मोबाईलमध्ये सेल्फी काढायचे. नवतरूण याच्या कढड्यावर बसून न भविष्याच्या गप्पा मारायचे. तर मॉर्निंग वॉकला येणारे याच पुलच्या कढड्याचा आधार घेऊन व्यायाम करायचे. याच पुलाने बैलगाडीचा प्रवास पाहिला, सायकलचा प्रवास पाहिला, मोटारसायकलचा पाहिला, फीयाट एॅबॅसिडरचा पाहिला, विक्रम रिक्षा पाहिली, रायगड पुणे एसटीची मिनी बस पाहिली तर ऑडी आणि मर्चिडीस ही पाहिली. शिवजोती पाहील्या- भिमजोत पाहिल्या, मोर्चे पाहिले, लग्नाच्या वराती पाहिल्या, डुलत जाणारे बेवडे (तळीराम) पाहिले, अपघात पाहिले, मृत्यू पाहिले तशाच भांडणे व मारामाऱ्याही पाहिल्या, मात्र कोणाचीच बाजू न घेता प्रत्येक वेळी तटस्थ भुमिका घेतली.

सार्वजनिक बांधकाम विभाग ज्याला त्या काळी बी एण्ड सी म्हटल जायच त्यांनी १९७४ साली या पुलाची निर्मिती केली होती. लाडवली येथील नदीवर बांधलेल्या या पुलाला पाडून या जागी जवळपास ४.५ कोटींचा भव्य गर्डचा सिमेंट काँक्रीटचा चार गाळ्याचा ८० मिटर लांबीचा व १६ मिटर रुंदीचा या पुला पेक्षा दोन मिटर उंचीचा पुल बांधला जाणार आहे, मात्र जरी नवा पुल हा उंचीने मोठा असला तरी रायगड वासियांच्या मनातली जागा जुना पुलाची कधीच कमी होणार नाही. लहान थोरांना आपलस करणारा हा पुल प्रत्येकाच्या मनात एक वेगळी जागा निर्माण करून जात आहे. या त्याच्या जाण्याचे दुःख न करता त्याच्यातल्या गुणांचे अनुकरण करून त्याला सरत्या २०२३ वर्षात खऱ्या अर्थाने निरोप देण्याची गरज आहे.

# गोवा मुक्तीसंग्रामाचा इतिहास अन् लढा




पोर्तुगीजांच्या ताब्यात असलेला गोवा १९ डिसेंबर १९६१ रोजी पारतंत्र्यातून मुक्त झाला आणि भारतात त्याचा समावेश झाला. अनेकांनी प्राणांचे मोल देऊन गोव्याला स्वातंत्र्य मिळवून दिले...

१५१० मध्ये पोर्तुगीजांनी गोव्याच्या भूमीवर पाय ठेवला तेव्हापासून गोमंतकीय जनतेचे जे नष्टचर्य सुरू झाले ते तब्बल साडेचारशे वर्षांनंतर १९ डिसेंबर १९६१ रोजी संपले. १९६१च्या युद्धानंतर भारतभूमीवरील उरलेसुरले पोर्तुगीज अधिपत्य समाप्त झाले, तसेच गोवा, दमण व दीव हा प्रदेश संपूर्णपणे मुक्त झाला. या अर्थाने, १९६१चे युद्ध हा गोवा मुक्ती प्रक्रियेचा शेवटचा व अत्यंत महत्त्वपूर्ण टप्पा होता.

हे मुक्तियुद्ध म्हणजे गोवा मुक्ती आंदोलनाचा निर्णायक भाग होता. या युद्धाव्यतिरिक्त गोवा मुक्ती आंदोलनाचा खूप मोठा इतिहास आहे, ज्यामध्ये स्थानिक गोवेकर स्वातंत्र्यसैनिकांचा खूप मोठा वाटा आहे. भारतातील घडामोडी शांत झाल्यावर पंतप्रधान पंडित नेहरु यांनी गोव्याच्या स्वातंत्र्यावर भर दिला; पण गोव्याचे भारतात विलिनीकरण करण्याच्या बाजूने पोर्तुगीज नव्हते. नेहरु यांनी भारत आणि पोर्तुगीज कॉलनीत चांगले संबंध राहण्याच्या दिशेने पाऊले उचलली; पण या कॉलन्यांमधील प्रशासक भारताला सहकार्य करीत नव्हते. अखेर नेहरु यांनी संयुक्त राष्ट्रसंघाच्या माध्यमातून पोर्तुगीजांवर दबाव आणला. शांततेच्या मार्गाने भारत सोडून जाण्याचा संदेश दिला. वाटाघाटी यशस्वी होत नसल्याने जवाहरलाल नेहरु यांनी १७ डिसेंबर १९६१ रोजी आंतरराष्ट्रीय दबावाला न जुमानता भारतीय सैन्य गोव्यात घुसवण्याचा निर्णय घेतला. गोव्यातील जनतेने सैन्याचे स्वागत आणि सहकार्य केले. अखेर १९ डिसेंबर १९६१ रोजी गोव्यात तिरंगा फडकला आणि गोवा मुक्त झाला. दीव आणि दमण आधीच मुक्त झाले होते.

या तिघांना मिळून केंद्रशासित प्रदेशाचा दर्जा मिळाला. नंतर १९६७मध्ये सार्वमताने गोवा घटक राज्य म्हणून घोषित झाले. गोवा, दमण व दीव या केंद्रशासित प्रदेशात १९६३ साली निवडणूक झाली. दोन्ही खासदार व बहुसंख्य आमदार महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षाचे निवडून आले. पक्षाचे अध्यक्ष दयानंद बांदोडकर यांनी निवडणूक लढवली होती. बांदोडकर हे या प्रदेशाचे पहिले मुख्यमंत्री ठरले. पणजी हे शहर गोव्याची राजधानी असून वास्को हे राज्यातील सर्वांत मोठे, तर पोर्तुगीजांचा प्रभाव असलेले ऐतिहासिक मडगाव हे राज्यातील महत्त्वाचे शहर आहे.

**–संजीव वेलणकर**




# जास्त यूपीआय आयडी असे करा त्वरित डिलीट

बऱ्याचदा जेव्हा तुम्ही नवीन स्मार्टफोनमध्ये सिम कार्ड टाकता तेव्हा तुम्हाला पुन्हा ऑनलाइन पेमेंट करण्यासाठी यूपीआय सेटअप करावा लागतो. असे केल्यास तुमचे अनेक यूपीआय आयडी बनतात, ज्यामुळे तुम्ही हॅकर्सच्या रडारवर



सहज येता. त्यामुळे जर तुमच्याकडे एकापेक्षा जास्त यूपीआय आयडी असतील तर तुम्ही त्या डिलीट केल्या पाहिजेत.

**यूपीआय आयडी अनलिंक करण्याची पद्धत**

* सर्वप्रथम त्या यूपीआय आयडीनं लॉगिन करा, जो तुम्हाला बँक अकाऊंटपासून अनलिंक करायचा आहे.
* त्यानंतर तुमच्या प्रोफाईलवर विजिट करा. त्यानंतर यूपीआय सेटिंग टॅबमध्ये जा.त्यानंतर बँक अकाऊंट सिलेक्ट करा, जो यूपीआय आयडी पासून अनलिंक करायचा आहे.
* पुढे डीॲक्टिव्हेट ऑप्शन निवडा. किंवा रिमूव्ह बँक अकाऊंटचा ऑप्शन सिलेक्ट करा.
* त्यानंतर कंफर्म ऑप्शनवर क्लिक करा. अशाप्रकारे तुमची प्रॉसेस पूर्ण होईल.
* ह्या प्रॉसेसचा वापर करून बँक अकाऊंट यूपीआय आयडी पासून अनलिंक होईल.

**बंद होतील इनॲक्टिव्ह यूपीआय आयडी**


मल्टीपल यूपीआय आयडीमुळे हॅकिंगचा धोका वाढतो, ज्यामुळे बँक फ्रॉड होण्याची शक्यता वाढते. नॅशनल पेमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया म्हणजे एनपीसीआयनं एक सर्कुलर जारी करून इनॲक्टिव्ह यूपीआय आयडी ब्लॉक करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानंतर सर्व यूपीआय प्लॅटफॉर्मवरील इनॲक्टिव्ह यूपीआय आयडी ३१ डिसेंबर नंतर बंद केले जातील, जे गेल्या एक वर्षांपासून किंवा त्यापेक्षा अधिक काळ वापरण्यात आले नाहीत.

**यूपीआय युजर्सची संख्या वाढली**

भारतात यूपीआय पेमेंटच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे, ज्यामुळे भारतात यूपीआय पेमेंट करणाऱ्या युजर्सच्या संख्येत सतत वाढ होत आहे. एनपीसीआयची आकडेवारी पाहता मागील महिन्यात नोव्हेंबरमध्ये ११.२३ अब्जापेक्षा जास्त यूपीआय व्यवहार झाले आहेत.

रिजर्व्ह बँक ऑफ इंडियाचे गव्हर्नर शक्तीकांत दास ह्यांनी एज्युकेशन इंस्टीट्यूट आणि हॉस्पिटल मध्ये यूपीआय पेमेंट लिमिट वाढवणार असल्याची हिंट दिली आहे. जी एक लाख रुपयांवरून पाच लाख रुपये केली जाऊ शकते. त्यामुळे उपचार आणि शिक्षणासाठी ऑनलाइन पेमेंट करणं सोपं होईल.

# हरहुन्नरी कलावंत ओमप्रकाश बक्षी



**निमित्त**

चरित्र अभिनेते ओमप्रकाश बक्षी यांचा जन्म १९ डिसेंबर १९१९ रोजी झाला २१ फेब्रुवारी १९९८ रोजी त्यांचे निधन झाले. या हरहुन्नरी कलावंताबद्दल जाणून घेऊया.

ओमप्रकाश यांना चरित्र अभिनेता म्हटले म्हणजे झाले, अशी वस्तुस्थिती नाही. हा कलावंत नायक, खलनायक, चरित्र अभिनेता, चित्रपट निर्माता, दिग्दर्शक आणि विनोदी अभिनेताही होता. त्यांच्या विनोदी भूमिकांचे प्रमाण थोडे जास्त असल्यामुळे पटकन ओमप्रकाश कोण, तर ‘विनोदी अभिनेता ना!’ असेच म्हटले जाते; पण विविध प्रकारच्या भूमिकांतून अभिनयाचे विविध पैलू दाखवणारे हे व्यक्तिमत्त्व तसे फार वेगळे होते.

लाहोर येथे सधन कुटुंबात जन्मलेल्या ओमप्रकाश बक्षी यांना लहानपणापासून चित्रपटांचेच आकर्षण होते. आपण सिनेमात जाऊन अभिनेता व्हावे, असे त्यांना वाटत होते; पण मार्ग सापडत नव्हता. वयाच्या सतराव्या वर्षी त्यांनी लाँड्री व्यवसाय सुरू केला; पण दोन वर्षांतच तो बंद करून ते लाहोरच्या रेडिओ स्टेशनवर नोकरीस गेले. तेथे होणाऱ्या नाटकांमध्ये एक कलाकार म्हणून ते बऱ्यापैकी रमले; पण काही काळातच तेही त्यांनी बंद केले; पण बहुधा त्यामधील त्यांचे काम पाहून प्रसिद्ध चित्रपट निर्माते दलसुखलाल पंचोली यांनी त्यांना बोलावून घेतले आणि आपल्या ‘दासी’ चित्रपटातील एक भूमिका त्यांना देऊ केली. १९४४मध्ये ‘दासी’ प्रदर्शित झाला आणि चांगला चाललाही! नंतर धमकी, शहर से दूर, पगडंडी, आयी बहार, असे काही चित्रपट त्यांना मिळत गेले. १९४७च्या फाळणीवेळी ते लाहोर सोडून मुंबईला आले; पण एक–दोन वर्षे मुंबईतील चित्रपट जगतात त्यांना काम मिळाले नाही.

१९४८मध्ये निर्माते जयंत देसाई यांनी त्यांना ‘लखपती’ या चित्रपटात खलनायकाचे काम दिले. ओमप्रकाश यांचे त्यापूर्वीचे एक–दोन चित्रपट देसाई यांनी पाहिले होते. त्यामुळेच हा कलावंत व त्याचे गुण त्यांनी जाणले होते. आणि जयंत देसाईंचा तो अंदाज खरा ठरला व ‘लखपती’मधून ओमप्रकाश यांना प्रसिद्धी मिळून त्यांची वाटचाल सुरु झाली. ती अखंड सुरूच राहिली.

ओमप्रकाश यांची बोलण्याची विशिष्ट ढब, आवाजातील चढ–उतार, त्यात मधूनच आणलेला हेतुपुरस्सर चिरकेपणा आणि जबरदस्त टायमिंग या उपजत वैशिष्ट्यांमुळे हा कलावंत समोर कोणताही अभिनेता असला तरी आपला प्रभाव पाडून जात असे! ओमप्रकाश नायक म्हणून शोभणारा चेहरा घेऊन आले नव्हते; पण तरीही ‘घंघरू’ या १९५२च्या चित्रपटात त्यांनी प्रौढ नायकाची भूमिका केली होती.

अभिनयाव्यतिरिक्त ओमप्रकाश यांनी ‘लाइट अँड शेड’ ही स्वतःची निर्मितीसंस्था काढून, दुनिया गोल है, चाचा झिंदाबाद, संजोग, जहाँ आरा, गेट वे ऑफ इंडिया, कन्हैया अशा काही चित्रपटांची निर्मितीही केली होती. त्यातील काही चित्रपट त्यांनी स्वतः दिग्दर्शितही केले होते. परंतु उत्कृष्ट गीते आणि वेगळी कथानके असलेले हे चित्रपट प्रचंड लोकप्रियता मिळवू शकले नव्हते, एवढेच ओमप्रकाश यांचे दुर्दैव होते. परंतु त्यांची चित्रपटसृष्टीतील एकूण कारकीर्द यशस्वी आणि देदीप्यमान ठरली. जातिवंत, उत्कृष्ट अभिनेता म्हणूनच त्यांचे नाव आदराने घेतले जाते! अशा या कलावंताला अभिवादन करून त्यानेच निर्मिती केलेल्या चित्रपटातील एक सुनहरे गीत अनुभवू या!

ओमप्रकाश यांनी निर्मिती केलेला ‘संजोग’ हा चित्रपट १९६१मध्ये प्रदर्शित झाला होता. प्रदीपकुमार आणि अनिता गुहा हे त्याचे नायक–नायिका होते. प्रमोद चक्रवर्ती यांनी तो चित्रपट दिग्दर्शित केला होता. राजेंद्रकृष्ण यांनी लिहिलेली आठ गीते या चित्रपटासाठी मदनमोहन यांनी संगीतबद्ध केली होती.

**–पद्माकर पाठकजी**

**क्लिक...क्लिक...!**



**गोवा : नाताळ आणि नववर्ष पार्ट्यांसाठी येथील समुद्रकिनाऱ्यांना पर्यटकांची विशेष पसंती असते. त्यानिमित्त येथील व्यावसायिकांसह, प्रशासन सज्ज झाले आहे.** (छाया : शरद जाधव)

## आरोग्य प्रहर

# थंडीत रात्री झोपण्यापूर्वी दोन अंजीर अवश्य खा!

अंजीर थंडीत खाल्ल्याने शरीरात उब तयार होते. हिवाळ्यात अंजीर जर रात्री दूधात भिजवून खाल्ले तर आरोग्याला अत्यंत लाभदायक असते. अंजीरात एंटीऑक्सीडेंट्स, फायबर, झिंक, मॅगनीज, मॅग्नेशियम आणि आयर्न सारखे पोषक तत्वे भरपूर प्रमाणात आढळतात. त्यामुळे जर हिवाळ्यात तुम्ही नियमित अंजीर खात असाल तर तुमचे आरोग्य चांगले रहाते. तुम्ही फिट आणि हेल्दी राहाल. अंजीराचा आहारात समावेश केल्याने तुम्हाला नवचैतन्य वाटू लागेल. तर पाहूयात अंजीरात काय फायदे आहेत.



**रक्तदाबाची समस्या –** अंजिरात पोटॅशियम खनिज असल्याने त्याचे नियमित सेवन ब्लड प्रेशर नियमन करण्यास फायदेमंद ठरते. तसेच ते सोडीयमच्या हानिकारक प्रभावाला कमी करते.

**लैंगिक समस्या –** अंजीरात झिंक, मॅगनीज, मॅग्नेशियम आणि आयर्न सारखे खनिज आढळतात. ही सर्व तत्वे तुमच्या लैंगिक आरोग्य राखण्यास मदत करते.

**हृदयाचे आरोग्य राखते –**अंजीरात मोठ्या प्रमाणात एंटीऑक्सीडेंट आढळते. यामुळे तुमच्या ब्लडप्रेशरला नियंत्रित करण्यास मदत मिळते. तसेच हृदयाचे आरोग्य राखण्यास देखील त्यामुळे मदत मिळते.

**डायबेटिसमध्ये लाभदायक –** अंजीरात मोठ्या प्रमाणावर पोटॅशियम आढळते. हे पोटॅशियम क्लोरोजेनिक एसिड आणि ब्लड शुगर लेव्हल कमी करण्यासाठी तुम्हाला मदत करत असते.

**आजारांना दूर ठेवते –** अंजिराचा आहारात वापर केल्याने तुमच्या शरीरातील ट्रायग्लिसराईड्सचा स्तर कमी होतो. हा स्तर तुमच्या हृदयाच्या समस्यांचे मुख्य कारण आहे.

**पिरीयड्समध्ये आराम –** अंजिरात झिंक, मॅगनिज, मॅग्नेशियम आणि आयर्न सारखे खनिज आढळतात. ही सर्व तत्वे पिरीयड्स दरम्यान महिलांना होणाऱ्या समस्यामध्ये खूपच लाभदायक आहे.

**हाडांना मजबूत करते –** अंजिरात एंटीऑक्सीडेंट्स आणि फायबर आढळतात. त्यामुळे हार्मोन असंतुलन आणि पीरीडीयड्स मध्ये महिलांना होणारा त्रास कमी होतो. हाडांसाठीदेखील अंजीर चांगले आहे.

**वजन कमी करण्यासाठी –** अंजिरात कॉपर, मॅग्नेशियम, फॉस्फरस, पोटॅशियम सारखे पोषक तत्वे आढळतात. त्यामुळे तुमचे मेटाबॉलिजम ठीक रहाते आणि वजन कमी होण्यासदेखील मदत मिळते.

***(ही सर्व माहिती सामान्यज्ञानावर आधारित आहे. योग्य आहार नियोजनासाठी तुम्ही तुमच्या डॉक्टरांशी संपर्क करावा.)***

# निवडक



## पेडली हायस्कूलला साहित्यभेट

**पाली** : सन २०००-०१ या वर्षीच्या इयत्ता दहावी बॅचच्या विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन शारदा विद्यामंदिर पेडली हायस्कूलच्या सर्व वर्गात दर्जेदार फळे व पंखे भेट दिले. त्यांच्या या कार्याबद्दल शाळेकडून विद्यार्थ्यांना आभारपत्र देण्यात आले. जागृती शिक्षण मंडळ या संस्थेचे संस्थापक शिक्षण महर्षी तसेच अध्यक्ष जे. बी. गोळे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम झाला. या वेळी संस्थेचे सेक्रेटरी राजेश गोळे, मुख्याध्यापक नेमाडे सर, तळेकर सर, सामाजिक कार्यकर्ते बळीराम जाधव, प्रदीप गोळे, माजी विद्यार्थी रमेश जाधव, सरिता चव्हाण, प्रशांत सागळे, राजेंद्र पवार, महेंद्र जाधव, नरेश गवारणे, राहुल कांबळे आदी उपस्थित होते.

## बाळासाहेब आखाडे तालुका प्रमुखपदी

**चौक** : शिवसेना ओबीसी सेलच्या खालापूर तालुका



प्रमुखपदी सरपंच बाळासाहेब आखाडे यांची नुकतीच निवड करण्यात आली. चावणी ग्रामपंचायतीचे थेट सरपंच म्हणून बाळासाहेब आखाडे हे निवडून आले आहेत. त्यांनी नुकताच शिवसेनेत प्रवेश केला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली, आमदार महेंद्र थोरवे यांच्या नेतृत्वाखाली, रायगड जिल्हा प्रमुख संतोष भोईर यांच्या आदेशाने ही निवड करण्यात आली. आखाडे यांची निवड होताच सर्वच स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## रिल्सस्टार स्पर्धेत शिवन्या बोराडे चमकली

**चौक** : अनिकेत घुले मित्र परिवाराच्या वतीने रिल्स स्टार या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. खोपोलीतील दोन वर्षांची शिवन्या बोराडे हिने छाप पाडत चौथा क्रमांक पटकावला, त्यामुळे शिवन्या बोराडेवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. तिला आयोजक अनिकेत घुले यांच्या वतीने सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र व रोख रक्कम देऊन गौरवण्यात आले. स्पर्धेत सुमन नलावडे व अमीन खान यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. शिवन्या बोराडे हिला इंस्टाग्रामवर उत्स्फूर्तपणे प्रतिसाद मिळत असून इंस्टाग्रामवर ४५ हजारांहून अधिक फॉलोअर्स आहेत.



# बोरघाटात एसटी बसचे ब्रेक निकामी!

## सुदैवाने प्रवासी बचावले

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्गावर बोरघाटात स्वारगेट (पुणे)-मुरूड या एसटी बसचे ब्रेक निकामी झाल्याने चालकाने प्रसंगावधान राखून बस रस्त्यालगतच्या मातीच्या भरावावर चढवली. यामुळे संभाव्य गंभीर अपघात टळला. ही घटना रविवारी (दि. १७) रात्री घडली.

बोरघाटातून जुन्या मुंबई-पुणे महामार्गाने खंडाळा येथून मुंबईकडे माल वाहून नेणारा ट्रक (एमएच २० बीएल ३२७७) अंडा पॉईंटजवळ आला असता ट्रकचा ब्रेक फेल झाला. हा ट्रक हाईट बॅरिकेड्सला आदळून जागीच थांबला. त्याचदरम्यान बदलापूर येथील दोन जण कारने खंडाळा येथे जात होते. त्यांची कार हाईट बॅरिकेड्सजवळ आली असता ब्रेक फेल ट्रक हाईट बॅरिकेड्सला आदळून कारला धडकला. सुदैवाने कारला मोठा अपघात झाला नाही. या अपघातात





कारमधील दोन जण किरकोळ जखमी झाले. मिलिंद अशोक भवर (वय २६) व अभिजित अंकुश कळसकर (वय ४२, दोघेही रा. बदलापूर) अशी जखमी व्यक्तींची नावे आहेत.

या एसटी बसमध्ये ३५ प्रवासी होते. त्यापैकी १० ते १२ जणांना किरकोळ मार लागला. त्यांना स्थानिक रुग्णालयात उपचारासाठी पाठवण्यात आले होते. पोलीस व बचाव यंत्रणांनी बस बाजूला घेतल्यानंतर वाहतूक पूर्ववत करण्यात आली. अपघाताचे वृत्त खोपोली समजतात अपघातग्रस्त मदत टीमचे गुरूनाथ साठीलकर व त्यांचे सहकारी रुग्णवाहिकेसह घटनास्थळी दाखल झाले. सर्व सुखरूप असल्याने सर्वांनी नि:श्वास सोडला.

# राज्य मासा पापलेटच्या संवर्धनासाठी अभ्यास समिती स्थापणार

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

सर्वांच्या आवडीच्या पापलेटला (सिल्वर पॉम्फ्रेट) सरकारने 'राज्य मासा' म्हणून दर्जा दिला आहे. बेसुमार मासेमारीमुळे या प्रजातीला धोका निर्माण झाल्याने त्याच्या संवर्धनासाठी उपाययोजना सुचवण्यासाठी तांत्रिक अभ्यास समिती स्थापन करण्याचा निर्णय राज्य सरकारच्या कृषी पशुसंवर्धन दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभागाने घेतला आहे.

राज्य सरकारने पापलेटला दोन महिन्यांपूर्वीच राज्य माशाचा दर्जा दिला आहे. जिल्ह्यातील सागरी हद्दीत पकडले जाणारे पापलेट खवय्यांच्या नेहमीच पसंतीस उतरतात. या माशांची निर्यातही मोठ्या प्रमाणात होते. जीवनाबंदर, बोर्ली, साखर-आक्षी ही मत्स्य बंदरे पापलेटसाठी विशेष प्रसिद्ध आहेत. बेसुमार आणि नियमांचे भंग करून केलेल्या मासेमारीमुळे या माशाचे अस्तित्व धोक्यात आले आहे.

यामुळे ८ डिसेंबर रोजी प्रसिद्ध झालेल्या सरकारी निर्णयात राज्य मासा पापलेटचे अधिवास सुधारणे, प्रजनन कालावधी व क्षेत्र इत्यादीचा अभ्यास करून संवर्धन व संरक्षणासाठी उपाययोजना करण्यासाठी मत्स्य व्यवसाय विभागाच्या आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली तांत्रिक अभ्यास समिती स्थापन करण्यात आली आहे.



**वाढत्या मागणीमुळे पापलेट माशाला चांगले दर मिळत आहेत. त्यामुळे त्याचे प्रमाण कमी होणार आहे. यासाठी मासेमारीचे काही नियम तयार करणे गरजेचे होते. ही जबाबदारी संवर्धन समितीवर आहे. त्याचबरोबर पापलेटच्या संवर्धनासाठी रूपरेषा ठरवण्याचे काम समिती करणार आहे.**

**- संजय पाटील,**
**सहउपायुक्त, मत्स्यव्यवसाय विभाग, रायगड**

मत्स्य प्रजातीचे जतन करण्यासोबत सागरी परिसंस्थेचे रक्षण, लहान माशांच्या मासेमारीला आळा घालणे आणि शाश्वत मासेमारी पद्धतीला प्रोत्साहन देण्याच्या महत्त्वपूर्ण गरजेबद्दल जागरूकता वाढवणे याबाबत उपाययोजना करण्यासाठी समिती काम करणार आहे.

### पेण आदिवासी बालिका बलात्कार, हत्या प्रकरण

# आरोपीला ३० डिसेंबर रोजी न्यायालय सुनावणार शिक्षा

**अलिबाग : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील मळेघर आदिवासीवाडीवरील तीन वर्षीय बालिकेवर बलात्कार करून निर्घृण हत्या केल्याप्रकरणी आरोपीवर न्यायालयात दोष सिद्ध झाला आहे. ३० डिसेंबर रोजी न्यायालय शिक्षा सुनावणार आहे. सोमवारी (दि. १८) याप्रकरणी सुनावणी झाली.




पेण तालुक्यातील मळेघर आदिवासीवाडीवरील तीन वर्षीय बालिकेवर बलात्कार करून तिची निर्घृण हत्या करण्यात आली होती. २० डिसेंबर २०२० ही घटना घडली होती. याबाबत अलिबाग जिल्हा न्यायालयात तीन वर्षांपासून खटला सुरू आहे. जिल्हा मुख्य न्यायाधीश अजय राजदेकर यांच्या न्यायलायात या खटल्याची सुनावणी सुरू आहे. दोन्ही पक्षातर्फे युक्तीवाद पूर्ण झाला आहे. जिल्हा पोलिसांनी आरोपी आदेश पाटील याला अटक केली. आरोपी गुन्हेगारी प्रवृत्तीचा असून अलिबाग येथे एका गुन्ह्यात शिक्षा भोगत होता. पॅरोलवर तो घरी आला असता त्याने हे कृत्य केले. पेण पोलीस ठाण्यात आरोपी विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. हा गुन्हा जलदगती न्यायालयात चालविण्यासाठी राजकीय तसेच सामाजिक संघटनांनी मागणी केली होती.

या खटल्यासाठी विशेष सरकारी वकील म्हणून अ‍ॅड. उज्वल निकम याची नियुक्ती राज्य शासनाने केली आहे. जिल्हा सरकारी वकील अ‍ॅड. भूषण साळवी हे सहाय्यक म्हणून काम पाहत आहेत. न्यायाधीश अजय राजदेकर यांनी खटल्यातील आरोपी दोषी असल्याचे म्हटले आहे. दोन्ही पक्षांचा युक्तिवाद न्यायलयाने ऐकला असून या खटल्याचा निकाल राखून ठेवला असून ३० डिसेंबर रोजी अंतिम निकाल दिला जाणार आहे. न्यायालय काय शिक्षा सुनावते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# कबड्डी सामन्यादरम्यान प्रेक्षक गॅलरी कोसळली

## चारजण जखमी

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

तालुक्यातील गरुडपाडा येथे कबड्डीचे सामने सुरू असताना प्रेक्षक गॅलरी कोसळली. त्यात चारजण जखमी झाले. तिघांना उपचार करून सोडण्यात आले असून एकाला अधिक उपचारासाठी अन्य रुग्णालयात हलवण्यात आले. ही घटना शनिवारी (दि. १७) रात्री १०.३० ते ११ वा. च्या सुमारास घडली असल्याची माहिती अलिबाग पोलिसांनी दिली. अचानक प्रेक्षक गॅलेरी पडल्याने एकच खळबळ उडाली.

गरुडपाडा येथे कबड्डी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धा पाहण्यासाठी बहुसंख्येने प्रेक्षकांनी गर्दी केली होती. शेकडो प्रेक्षक बसतील अशी प्रेक्षक गॅलरी तयार करण्यात आली होती. कबड्डीचा खेळ बघण्यात मग्न असताना अचानक लोखंडी प्रेक्षक गॅलरी कोसळली. त्यामध्ये चारजण जखमी झाले.

दोघांना किरकोळ तर आणखी दोघांना गंभीर दुखापत झाली. चौघांवर अलिबागमधील जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली.


### जाहीर प्रसिद्धीकरण

पुढे नमुद केलेल्या सहकारी संस्थेचे सन २०२३ ते २०२८ या कालावधीतील पंचवार्षिक निवडणूकीसाठी निवडणूक कार्यक्रम प्रसिद्ध करण्यात येत आहे. संस्थेचे नाव - कामधेनु गार्डेनिया सहकारी गृहनिर्माण संस्था, कोयनावळे, पनवेल, जिल्हा - रायगड. सदर कार्यक्रमानुसार नामनिर्देशन पत्र स्विकृती दि. २१/१२/२०२३ ते दि. २८/१२/२०२३, नामनिर्देशन पत्र छाननी दि. २९/१२/२०२३, नामनिर्देशन माघारी दि. ०२/०१/२०२४ ते दि. १६/०१/२०२४ व आवश्यकतेनुसार मतदान दि. २८/०१/२०२४ रोजी घेण्यात येईल. तपशिलवार निवडणूक कार्यक्रम, निवडणुकीबाबत सूचना व अधिक माहिती संस्थेचे कार्यालयात व तालुका सहकारी निवडणूक अधिकारी, पनवेल, पहिला मजला, कृषी उत्पन्न बाजार समिती, सहकार नगर, रायगड बाजारच्या बाजूला, जिल्हा-रायगड ४१०२०६ यांचे कार्यालयात पहावयास मिळेल. तरी संस्थेच्या सभासदांनी याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**(राजाराम शंकर गोळे)**
निवडणूक निर्णय अधिकारी


# अंजुमन महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे निवासी शिबिर

**मुरूड : प्रतिनिधी**

अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे सात दिवसीय विशेष निवासी शिबिर मजगाव येथे उत्साहात झाले. शिबिराचा समारोप शनिवारी (दि. १६) झाला.

या शिबिराचे उद्घाटन प्रसंगी राष्ट्रीय सेवा योजना, मुंबई विद्यापीठातर्फे जिल्हा समन्वयक डॉ. टी. पी. मोकल, महाविद्यालयाचे चेअरमन जैनुद्दीन कादिरी तसेच महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. साजिद शेख यांची प्रमुख उपस्थिती होती.

शिबिरार्थींनी ग्रामस्वच्छता केली, प्लास्टिकचे संकलन तसेच जिल्हा परिषद शाळा मजगाव येथील शाळेचा परिसर स्वच्छ करून तेथील



फुलांच्या बागेची डागडुजी केली. शासनाच्या वेगवेगळ्या योजनांची माहिती लोकांपर्यंत पोहचवली व जवळपास २५० आभा कार्ड व ५० ई-श्रम कार्ड बनवून त्याचे वितरण करण्यात आले. प्लास्टिकमुक्त भारत या अभियानांतर्गत वृत्तपत्रापासून पिशव्या बनवून बाजारामध्ये वाटप करण्यात आले.

जिल्हा परिषद शाळा व अंगणवाडी येथे विद्यार्थ्यांसाठी शाळेमध्ये जाऊन विविध स्पर्धांचे आयोजन केले. उद्योजकता विकास या कार्यक्रमांतर्गत फूड स्टॉल व गेम स्टॉल लावण्यात आले होते आणि त्याला गावातील लहान मुलांनी व नागरिकांनी भरघोस प्रतिसाद दिला. शिबिरार्थींसाठी स्वच्छता जनजागृती, सरकारी योजना व ग्रामीण विकास, जलसंवर्धन, पर्यावरण संरक्षण या विषयांवर पथनाट्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले, तसेच प्रत्येक दिवशी वेगवेगळ्या विषयांवर व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले होते.

समारोप समारंभाला अंजुमन विज्ञान महाविद्यालयाचे चेअरमन जैनुद्दीन कादिरी, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य इस्माईल शेख, तौसीफ फत्ते तसेच महाविद्यालयचे प्रभारी प्राचार्य डॉ. साजिद शेख हे उपस्थित होते. अ‍ॅक्टिव्ह कॅम्पर व बेस्ट ग्रुप यांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे यांनी शिबिरार्थींना मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या.

हे शिबिर यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. नितीन पवार, प्रा. समीक्षा माळी, प्रा. अल्ताफ फकीर, प्रा. तमसील शहाजहान व सर्व शिबिरार्थींनी परिश्रम घेतले.


### पनवेल महानगरपालिका

ता. पनवेल, जिल्हा - रायगड, पनवेल - ४१०२०६.

### जाहीर प्रकटन

पनवेल महानगरपालिका हद्दीतील सर्व रहिवासी मिळकत धारकांना या जाहीर प्रकटनव्दारे कळविण्यात येते की, प्रभाग समिती ब-०३, व प्रभाग समिती ड-१७ असे एकुण २० अतिधोकादायक इमातीतील रहिवाशांनी जिवीत व वित्तीयहानी टाळण्यासाठी ज्या मिळकत, इमारती धोकादायक झाल्या आहेत अथवा त्यांचा काही भाग धोकादायक झाला आहे, इमारतीमध्ये किंवा मिळकतीमध्ये कोणतेही वास्तव करु नये.

ज्या अर्थी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २६४ मध्ये नमुद केल्यानुसार ज्या इमारतींना ३० वर्ष पुर्ण झाली आहेत व ज्या आर्थी इमारतीचा प्रत्येक भाग आणि अतंर्गत प्रत्येक वस्तू तिच्यापासून धोका निर्माण होणार नाही अशा रीतीने दुरुस्त करुन सुस्थितीत ठेवणे हे प्रत्येक इमारतीच्या मालकाचे/ भोगवटादाराचे आवश्यक कर्तव्य आहे.

त्या अर्थी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २६५ अन्वये इमारतीचे मालक, भोगवटादाराची सदर इमारतीचे नोंदणीकृत बांधकाम अभियंता (Structural Engineer) यांच्या कडुन तपासणी (Structural Audit) करुन आवश्यकता असल्यास त्यांच्या देखरेखेखाली इमारतीची दुरुस्ती करुन बांधकाम सुस्थिती प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

ज्या अर्थी पनवेल महानगरपालिका हद्दीतील मिळकतधारकांनी स्ट्रक्चर ऑडिट रिपोर्ट सादर केला आहे. परंतु, ३३ मिळकतधारकांनी आजपावेतो सदरची धोकादायक इमारती/बांधकामे रिकामी केलेली नसल्याने, पावसाळ्यामध्ये धोकादायक इमारती पडुन हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यांची यादी महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर (Website) प्रसिध्द करणेत आलेली आहे.

त्याअर्थी संबंधितांनी अशा धोकादायक इमारती/बांधकामे तात्काळ रिकामी करुन अशी बांधकामे तात्काळ पाडून/उतरवून घ्यावीत. अन्यथा अशा धोकादायक इमारती कोणत्याही प्रकारची जिवित वा वित्तीयहानी झाल्यास त्यास संबंधित घरमालक/भोगवटादार हे जबाबदार राहतील या बाबतीत महानगरपालिका जबाबदार राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. (सोबत प्रभाग निहाय यादी.)

पमपा/अ.बां.नि./२४२३/जा.क्र.१०६/२०२३
दिनांक : १५/१२/२०२३

**सही/-**
**(गणेश देशमुख)**
आयुक्त
पनवेल महानगरपालिका


# अलिबाग वरसोली खंडोबा मंदिरात चंपाषष्ठी उत्सव हर्षोल्हासात साजरा

**अलिबाग : प्रतिनिधी**

तालुक्यातील वरसोली गावात प्रतीजेजुरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या खंडोबा मंदिरात चंपाषष्ठी उत्सव सोमवारी (दि. १८) मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. येळकोट येळकोट जय मल्हार असा जयघोष करीत भांडाऱ्याची उधळण कारण्यात आली.

वरसोलीतील खंडोबाचा उत्सव अमावस्येपासून सुरू होतो. यामध्ये पारायण करून चंपाषष्ठी हा दिवस खंडोबाचा जन्मदिवस म्हणून मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. या वेळी खंडोबाला वांग्याचे भरीत म्हणून प्रसाद अर्पण केला जातो.

वरसोली गावातील भगत कुटुंबातील कानु भगत मार्तंडाच्या ओढीने जेजुरीला गेले. तेथे त्यांनी एक तप तपश्चर्या केली. त्यांना आपल्या वरसोली गावात यावेसे वाटल्याने ते एका श्वानासह वरसोली गावात आपल्या घरी आले, पण त्यांना कोणी ओळखले नाही, त्यांची निर्भत्सना केल्याने ते परत निघाले. ग्रामस्थानी त्यांची माफी मागितली. त्यामुळे आताचे जे मंदिर आहे तिथे भंडारा उधळून त्या जागेवर मंदिर बांधावे असे सांगितले व कानु भगत पुन्हा जेजुरीला निघून गेले. प्रत्यक्ष मार्तंडाच्या पदस्पर्शाने वरसोलीची भूमी पावन झाली आहे.



**खोपोली : नगर परिषदेच्या मुख्याधिकारीपदाचा कार्यभार सोमवारी पंकज पाटील यांनी स्वीकारला. या वेळी उपमुख्य अधिकारी गौतम भगले व इतर विविध खात्यांच्या प्रमुख अधिकाऱ्यांनी त्यांचे स्वागत करून शुभेच्छा दिल्या. सर्व खातेप्रमुखांच्या तसेच नागरिकांच्या सहकार्याने शहराच्या विकासासाठी प्रयत्न करणार असल्याचे पाटील यांनी सांगितले.**

(छाया : जयवंत माडपे)




MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## SRM RE-TENDER NOTICE

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification.

| Sr.No | Tender/Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1. | Tender No:- EE/EHV (O &M )/ DIVN/MHD/Tech/RE-Tender-39/2023-24 Dtd.19.12.2023 RFxNo.7000029394 | Sub:- Invitation SRM RE-tender for providing & fixing of MVLC Insulation coating for ACSR conductor of 22kV T/F LV Bays at various substations under EHV (O&M) Dn, Mahad for FY 2023-24. | Rs. up to 24,73,013 (Including GST + 1% Labour CESS) |

EMD will be the 1% of the estimated cost or 5000/- whichever is the highest & tender fee will be the 500/-plus GST+1% Labour CESS. Bid submission is from 19.12.2023 @ 00:00 hrs to 25.12.2023 @23:59 Hrs for above tender For further details visit our website:-https://srmetender.mahatransco.in Contact Person:- The Addl. Executive Engineer, (O) : Phone No.7373101089 Note: All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV(O&M) Dn. Mahad**

# घणसोली पुलावरील वाहतूक कोंडी सुटणार

## काँक्रीटीकरण सुरू; एक मार्गिका बंद



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

ठाणे-बेलापूर महामार्गावर दोन ठिकाणी उड्डाणपुलाचे काम सुरू करण्यात येत आहे. तुर्भे उड्डाणपुलाचे काम फेब्रुवारीपर्यंत चालणार असून आता घणसोली येथील उड्डाणपुलाचे सिमेंट काँक्रीटीकरण कामाला सुरुवात करण्यात आली आहे. त्यामुळे हे या पुलावरील एक मार्गिका बंद राहणार आहे. यामुळे या मार्गावर वाहतूक कोंडी होण्याची शक्यता आहे.

दोन दिवसांपासून तुर्भे स्टेशन समोरील उड्डाणपुलाचे काम सुरू करण्यात आल्याने वजड वाहनांना पावणे पासून कळंबोलीच्या दिशेने जाण्यासाठी एमआयएडीसी अंतर्गत रस्ते मार्गाने इंदिरानगर पर्यंत जावे लागत आहे. त्यातच आता घणसोली उड्डाणपुलाचे काँक्रीटीकरण काम सुरू करण्यात आले आहे. एक तर शिळफाटा परिसरातील वाहतूक वाढली त्यात आता घणसोली उड्डाणपुलाच्या काँक्रीटीकरण काम सुरू केल्याने वाहनांच्या गतीला ब्रेक लागला आहे.

उड्डाणपुलावरील काम चालू असल्याच्या कालावधीत अंडरपास दिवसा बंद केल्यास, बेलापूरकडे जाणाऱ्या वाहनास ठाणे-बेलापूर रोडवर जायचे असल्यास ती वाहने महापे पुलाखालून यु टर्न घेऊन बेलापूर ठाणे रोडवर येतील, तसेच बेलापूर ठाणे रोडवरील वाहनास जर ठाणे बेलापुर दिशेकडे जायचे असल्यास त्यांनी रिलायन्स उड्डाणपुलाखालून यु टर्न घेऊन ती वाहने ठाणे-बेलापूर मार्गावर येऊ शकतील.

घणसोली उड्डाणपुलाचे काँकिटीकरण करण्याचे कामाचे दरम्यान काम पूर्ण होईपर्यंत वाहनांसाठी भुयारी मार्ग दिवसा पूर्णत: बंद करण्यात येत आहे. याला पर्यायी मार्ग म्हणून महापे पुलाखालून यु टर्न घेऊन बेलापूरर ठाणे रोड मार्गे वाहने इच्छीत स्थळी जातील. तसेच बेलापूरकडे जायचे असल्यास त्यांनी रिलायन्स पुलाखालून यु टर्न घेऊन वाहनांना इच्छीस्थळी जाता येईल.

घणसोली उड्डाणपूल येथे महापालिकेमार्फत काँकिटीकरण करण्यात येणार असून, त्याकरीता उड्डाणपुलाची प्रथम एक मार्गिका बंद करून व त्यानंतर दोन्ही मार्गिका तसेच उड्डाणपुलाखालील खालील अंडरपास बंद करून वाहतुक कोंडी किती होते काय याचा आढावा घेतला गेला. त्यावेळी दोन्ही मार्गिका बंद व अंडरपास बंद केल्यास वाहतुकी करीता बाजुच्या दोन मार्गिका तसेच सेवा रस्ता वरील दोन मार्गिका उपलब्ध होत असल्याचे दिसुन आले. तसेच वाहतुक सुरळीतपणे बेलापुर दिशेकडे मार्गस्थ होत असल्याचे दिसून आले. असा निष्कर्ष काढण्यात आला असा दावा वाहतूक विभागाने केला आहे.

# आयोध्येतील अक्षत मंगल कलश यात्रेचे नवी मुंबईमध्ये स्वागत

**नवी मुंबई : बातमीदार**

आयोध्यावरून आलेल्या पवित्र 'अक्षत मंगल कलश यात्रा' चे नवी मुंबईत राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, भाजपा, बजरंग दल, विश्व हिंदू परिषद यांच्यावतीने जय श्रीराम घोषणेत, शंख नाद करत, पवित्र मंत्रोच्चारात स्वागत करण्यात आले.



अयोध्यामध्ये भव्य श्रीराम मंदिरात येत्या २२ जानेवारी रोजी श्री राम लला यांची प्राणप्रतिष्ठा होणार आहे. या अभूतपूर्व कार्यक्रमाची निमंत्रण पत्रिका आणि अक्षता घरोघरी वितरित करण्यात येणार आहे. 'अक्षत मंगल कलश यात्रा'चे स्वागत करण्यासाठी माजी खासदार डॉ. संजीव नाईक, भाजप नवी मुंबई जिल्हाध्यक्ष संदीप नाईक, माजी महापौर सागर नाईक, माजी जिल्हाध्यक्ष रामचंद्र घरत, नवी मुंबई महापालिकेचे माजी सभागृह नेते रवींद्र इथापे, भाजपाचे महामंत्री अनंत सुतार, महामंत्री शशिकांत राऊत, महापालिकेचे माजी स्थायी समिती सभापती संपत शेवाळे, युवा मोर्चा अध्यक्ष अमित मेढकर, महिला अध्यक्ष माधुरी सुतार, सुहासिनी नायडू माजी नगरसेवक, माजी नगरसेविका विश्व हिंदू परिषद, बजरंग दलाचे पदाधिकारी कार्यकर्ते आणि भाजपचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

माजी खासदार डॉक्टर संजीव नाईक यांनी सांगितले की, राममंदिराचे उद्घाटन २२ तारखेला होणार आहे, परंतु दर्शनाचा लाभ आताच मिळेल. युद्धानंतर प्रभू रामचंद्र परतले होते. तेव्हा दिवाळी साजरी करण्यात आली होती. आता विश्वात दिवाळी साजरी होणार आहे. आता २२ जानेवारीची प्रतिक्षा आणि आतुरता आहे.

# सानपाडा भुयारी मार्गाच्या कामाचा शुभारंभ



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

सानपाडा पश्चिमेकडून पूर्वेकडे जाण्यासाठी एकमेव पर्याय असलेल्या सानपाडा भुयारी मार्गाच्या कामाला सिडको आणि वाहतूक विभागाच्या मदतीने सुरुवात करण्यात आली आहे. डागडुजीसाठी हा भुयारी मार्ग दीड महिना बंद राहणार असून काम पूर्ण झाल्यावर २३ जानेवारीनंतर वाहतुकीसाठी खुला केला जाणार आहे.

सानपाडा रेल्वे स्थानकाखालील या भुयारी मार्गावर वाहनांची वर्दळ असते, मात्र या मार्गाची पावसाळ्यापासून दुरवस्था झाली होती. रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्याने, वाहनचालकांचे हाल होत होते. त्यामुळे येथे वाहतूककोंडी होत होती. या पार्श्वभूमीवर, या भुयारी मार्गाची डागडुजी करण्याची मागणी वाहनचालकांसह काही लोकप्रतिनिधींनी सिडकोकडे केली होती. त्यानुसार आता सिडकोने या रस्त्याची डागडुजी सुरू केली आहे. या कामाचे भूमिपूजन शिवसेनेचे नेते विजय नाहाटा यांच्या हस्ते झाले. या वेळी या कामासाठी पाठपुरावा करणारे माजी परिवहन सदस्य विसाजी लोके आदी मान्यवर उपस्थित होते.

नियोजनानुसार, २२ जानेवारी २०२४ पर्यंत या भुयारी मार्गाच्या डागडुजीचे काम सुरू राहणार आहे. त्यानुसार दीड महिन्यांच्या कालावधीत वाहनांना या मार्गावरून ये-जा करण्यास बंदी घालण्यात आली आहे. तसा फलकही सिडकोने लावला आहे. यामुळे वाहनचालकांना आता दुसरा लांबचा पर्याय निवडावा लागणार आहे.

# राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगातर्फे पालिकेत आढावा

**नवी मुंबई : बातमीदार**

राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाचे सदस्य सुभाष पारधी यांनी नवी मुंबई महापालिका मुख्यालयास भेट देत अनुसूचित जातींकरिता नवी मुंबई महापालिकेच्या प्रशासकीय कामकाजात असलेली अधिकारी, कर्मचारी संख्या तसेच महापालिकेच्या वतीने अनुसूचित जातींकरिता राबविण्यात येणाऱ्या विविध सुविधा कामांचा तसेच कल्याणकारी योजनांचा बारकाईने आढावा घेत नवी मुंबई महापालिकेच्या वतीने करण्यात येत असलेल्या कामांबद्दल समाधान व्यक्त केले.



महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांनी नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने त्यांचा स्वागतपर सन्मान केला. या वेळी माजी राज्यसभा सदस्य विनय सहस्त्रबुध्दे, माजी लोकसभा सदस्य डॉ. संजीव नाईक, माजी महापौर सागर नाईक, राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाच्या सदस्यांचे स्वीय सचिव नवीन रोहिल्ला, जिल्हा समाजकल्याण अधिकारी समाधान इंगळे आदी मान्यवर उपस्थित होते.

या वेळी राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाचे सदस्य सुभाष पारधी यांनी नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील स्वयंसेवी संस्था प्रतिनिधींशी थेट संवाद साधला व अनुसूचित जातींकरिता महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येणाऱ्या कामांविषयी त्यांची मते जाणून घेतली. यावेळी प्रतिनिधींमार्फत विविध सूचना करण्यात आल्या. त्या निवेदन स्वरुपात स्विकारुन महानगरपालिकेमार्फत उचित कार्यवाही करावी व अहवाल सादर करावा, असे आयोगाचे सदस्य सुभाष पारधी यांच्यामार्फत सूचित करण्यात आले.

### *कामासंदर्भात कौतुक, सूचना*

*नवी मुंबई महापालिकेच्या कामकाजाचा आढावा घेताना अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले यांनी सादरीकरण केले. त्यावर अभिप्राय व्यक्त करताना अनेक बाबींमध्ये नवी मुंबई महापालिका इतरांपेक्षा चार पावले पुढे असल्याबद्दल प्रशंसा करीत राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाचे सदस्य सुभाष पारधी यांनी महापालिकेच्या वतीने यामध्ये भर घालत अधिक चांगले काम होईल, असा विश्वास व्यक्त केला.*



# सोनखार स्पोर्ट्स फेस्टिव्हल रॅली

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

सानपाडा पामबीच येथील सेक्टर १० मधील लहान मुले, विद्यार्थी, सर्व वयोगटांतील महिला-पुरुष व जेष्ठ नागरिकांसाठी आयोजित करण्यात आलेल्या विविध क्रीडा स्पर्धांमध्ये नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे यासाठी आवाहन करणारी जनजागृतीपर शोभायात्रा मोठ्या उत्साही वातावरण काढण्यात आली.

जनजागृती रॅलीमध्ये माजी विरोधी पक्षनेते दशरथ भगत, माजी नगरसेविका वैजयंती भगत, समाज सेवक संदीप भगत, युवा नेता निशांत भगत सहित सानपाडा येथील जेष्ठ नागरिक, महिला, पुरुष-लहान मुले, सोसायटीतील सदस्य व युवक यांनी आपला सहभाग उत्साहात नोंदवला तसेच नागरिकांना फेस्टिवल मधील विविध क्रीडा प्रकारात भाग घेण्यासाठी प्रोत्साहन करण्यात आले.

प्रभागातील रहिवासी असलेल्या या पिढीतील लहान मुलांसह, विद्यार्थी, नागरिक आणि महिला नागरिकांनी मोबाईल व इंटरनेटच्या विळख्यातून बाहेर पडून मैदानी खेळांत सहभागी होऊन आपले आरोग्य अधिक समृद्ध करावे या उद्देशासाठी यंदा प्रथमच सोनखार स्पोर्ट्स फेस्टिव्हलचे आयोजन करण्यात आले असून सानपाडा-पामबीच सोनखार विभागातील नागरिकांनी आपल्यासह मुलांना या फेस्टिवलमध्ये आयोजित सर्वच स्पर्धांमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन माजी नगरसेविका वैजयंती भगत यांनी केले आहे.

# डॉलर स्वस्तात देण्याचे आमिष दाखवून फसवणूक

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

अमेरिकन चलन असलेले डॉलर स्वस्तात देण्याचे आमिष दाखवून दोन लाखांची फसवणूक झाल्याचा प्रकार रविवारी नवी मुंबईतील घणसोली येथे घडला. याप्रकरणी रबाळे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अन्वर आणि एक वीस वर्षीय युवक असे यातील आरोपींची ओळख असल्याची पोलीस दफ्तरी नोंद करण्यात आली आहे. गुलफाम आलम अफसर अली असे फिर्यादीचे नाव असून ते कांदिवली येथे राहणारे आहेत. त्यांच्या परिचित एका नारळ विक्रेत्याने त्यांना २० डॉलरची नोट दाखवली होती. काही दिवसापूर्वी एक फोन आला व फोनवरील व्यक्तीने तो नारळ विक्रेत्याच्या भाऊ असल्याचे सांगितले व भावाने जशी नोट दाखवली तशा त्याच्या कडे एक हजार सातशे पन्नास प्रति २० डॉलरच्या नोटा असल्याची माहिती दिली. तसेच गरज असल्याने या नोटाच्या बदल्यात भारतीय रुपये हवे असल्याचे सांगितले. २ लाख भारतीय रुपयांच्या बदल्यात हे डॉलर देण्यास त्याची एक नातेवाईक तयार असल्याचे त्याने सांगितले. हा व्यवहार पूर्ण करण्यासाठी त्याने घणसोलीनजीक एका ठिकाणी बोलावले.

स्वस्तात एवढी मोठी रक्कम मिळते म्हणून अफसर याने पत्नीचे दागिने गहाण ठेवत २ लाख रुपये जमा केले व घणसोली येथे ठरल्या प्रमाणे गेले. त्याठिकाणी फोनवर बोलणारी व्यक्ती आणि त्याच्या सोबत विशीतील एक तरुण आला होता. अफसर याने दोन लाख रुपये दाखवत असतानाच त्याने हे पैसे पटकन हातात घेतले व डॉलरचे पुडके अफसर यांच्या पिशवीत टाकून पटकन घ्या कोणी पहिले असे सांगत निघूनही गेले. ते गेल्यावर जेव्हा पिशवीतील डॉलरचे पुडके पहिले तेव्हा केवळ वर एक डॉलरची नोट तर त्याखाली नोटेचा आकाराचे कागदी पुडके होते. याबाबत अफसर यांनी दिलेल्या तक्रारीवरून रबाळे पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे.

# मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून २३ रुग्णांना मदत

**नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**

आजारी लोकांना मदत करा या भावनेतून आजारी लोकांना पैशाच्या बाबतीत शक्य तितकी मदत केली पाहिजे या अनुषंगाने शासनाने मुख्यमंत्री वैद्यकीय अर्थसहाय्यता या कक्षाची उभारणी केली. बेलापूरच्या आमदार मंदा म्हात्रे यांच्या १ जुलै २०२२ ते ०१ नोव्हेंबर २०२३ या कालावधीत केलेल्या शिफारस पत्राद्वारे नवी मुंबई क्षेत्रातील गरीब व गरजू अशा २३ रुग्णांना मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीमधून रक्कम २५ लाख ३२ हजार पाचशे रुपयांची आर्थिक मदत करण्यात आली आहे.

वेळवर आणि जलद गतीने गरजू रुग्णांना आर्थिक मदतीचा लाभ झाल्याने रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांनी समाधान व्यक्त केले आहे. यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, मुख्यमंत्री अर्थसहाय्य निधीमधून असंख्य गोर गरीबांना निधीच्या माध्यमातून सुलभ शस्त्रक्रिया होत असून त्यांचे उपचार ही व्यवस्थितरित्या होत आहे. मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाने आपल्या सातत्यपूर्ण कामगिरीचा आलेख कायम राखत अवघ्या १४ महिन्यात १३ हजाराहून अधिक गोरगरीब-गरजू रुग्णांना एकूण ११२ कोटी १२ लाख रुपयांची आर्थिक मदत वितरित केली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व तत्कालीन माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संवेदनशीलतेमुळे मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीमध्ये अनेक-विविध आजारांचा समावेश देखील करण्यात आला आहे.

यामध्ये अँजिओप्लास्टी, बायपास सर्जरी, कर्करोगावरील शस्त्रक्रिया, केमोथेरपी, डायलिसिस, जन्मतः मूकबधिर लहान मुलांच्यासाठी अत्यावश्यक असणारी कॉकलीयर इनप्लांट शस्त्रक्रिया, सर्व प्रकारचे अवयव प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, रस्ते अपघात, विद्युत अपघात, भाजलेले रुग्ण, जन्मतः लहान मुलांच्या हृदयशस्त्रक्रिया आदींचा समावेश आहे.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाने रुग्णसेवेत उत्कृष्ट कामगिरी करून राज्यातील हजारो रुग्णांचे प्राण वाचविण्यात यश मिळविले आहे. यामुळे अनेक रुग्णांना अक्षरशः जीवनदान मिळाले आहे. गोरगरीब गरजू रुग्णांना दुर्धर आणि महागड्या शस्त्रक्रियांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षातून अर्थसहाय्य केले जाते. या निधीचा जास्तीत जास्त गरजू रुग्णांनी लाभ घ्यावा, असे आवाहन मुख्यमंत्री सहाय्यता कक्षाकडून होत आहे. या कक्षाचा वैद्यकीय मदतीचा आलेख कायम चढता राहिला असून यापूर्वी ५० तर आता १०० कोटी वैद्यकीय मदत देण्याचा टप्पा सर केल्यामुळे राज्यातील गरजू रुग्णासाठी हा निधी कक्ष हा एक आशेचा किरण ठरला असल्याचे आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले.

# बाल वैज्ञानिक परिषदेत नवी मुंबईच्या विद्यार्थिनींचा डंका

## प्रकल्पाची राष्ट्रीय स्तरावर निवड

**नवी मुंबई : बातमीदार**

भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागातर्फे आयोजित करण्यात आलेल्या ३१व्या राष्ट्रीय बाल विज्ञान परिषदेच्या नाशिक येथे झालेल्या राज्य पातळीवरील फेरीत नवी मुंबई महापालिका शाळा क्रमांक ४६ गोठीवली येथील पल्लवी सोळंखे व प्रिती चिन्हा राठोड या दोन विद्यार्थिनींनी सादर केलेल्या अभिनव प्रकल्पाची निवड पुढील राष्ट्रीय पातळीवर झाली आहे.

या त्यांच्या भरारीमुळे नवी मुंबई महापालिकेच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाची नाममुद्रा देश पातळीवर उमटली असून नवी मुंबई महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांनी त्यांचे कौतुक केले आहे. या वेळी अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले व विजयकुमार म्हसाळ, शिक्षण विभागाचे उपायुक्त योगेश कडुस्कर तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका कल्पना गोसावी आदी मान्यवर उपस्थित होते.

राष्ट्रीय बाल विज्ञान परिषद २०२३ या स्पर्धेत ४५०० हून अधिक विज्ञान प्रयोगांचा सहभाग असून यामध्ये ३६ जिल्हे सहभागी आहेत. जिल्हास्तरीय फेरीतील १८८ प्रकल्पांची निवड होऊन त्यापैकी ५२ प्रकल्पांची राज्यस्तरीय फेरीमध्ये निवड झालेली आहे. त्यापैकी ३० प्रकल्पांची राष्ट्रीय स्तरावर निवड करण्यात आली आहे.



जिज्ञासा ट्रस्ट यांच्या माध्यमातून या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून ठाणे येथील सुलोचना देवी संघानिया स्कूल याठिकाणी राष्ट्रीय पातळीवर निवडलेल्या ३० प्रकल्पांचे पत्रकार परिषदेप्रसंगी सादरीकरण करण्यात आले. तेथे सर्वात्तम १० प्रकल्पांमध्ये या आगळ्या वेगळ्या प्रकल्पाची नोंद झाली असून विल्हेवाट लावता येणारे महिलांचे लघवीचे साधन या नवी मुंबई महापालिकेच्या विद्यार्थिनींनी तयार केलेल्या अभिनव प्रकल्पाची निवड पुढील राष्ट्रीय पातळीवर झालेली आहे.

प्रसाधनगृहात विशेषत्वाने महिलांना जाणवणाऱ्या अडचणी व त्यामुळे होणारा त्रास याबाबत उपाय शोधण्याच्या दृष्टीने दोन विद्यार्थिनींनी विज्ञानाची कास धरत केलेला विचार व शोधलेला उपाय ही त्यांच्यामधील कल्पकता आणि शास्त्रीय दृष्टीकोन दाखविणारी गोष्ट असून महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांनी त्यांचे विशेष कौतुक केले. राष्ट्रीय बाल विज्ञान परिषदेचे अध्यक्ष सुरेंद्र दिघे तसेच राज्य समन्वयक विश्वास कोरडे यांनीही या विद्यार्थिनींच्या अडचणीतून शास्त्रीयदृष्ट्या मार्ग काढण्याच्या कल्पकतेची प्रशंसा केली.

नवी मुंबई महापालिका शिक्षण विभागाचे उपायुक्त योगेश कडुसकर तसेच शिक्षण अधिकारी अरुणा यादव यांनीही विद्यार्थिनींचे कौतुक करून अभिनंदन केले. नमुंमपा शाळा क्रमांक ४६ गोठीवली या शाळेतील विद्यार्थिनींनी शाळेच्या मुख्याध्यापक तसेच शिक्षण विस्तार अधिकारी कल्पना गोसावी, मुख्याध्यापक रघुनाथ शेलार, पंडीत लर्निंग लिंक्स फाऊंडेशन स्टीम लॅबच्या मार्गदर्शक स्नेहल पोदार तसेच वर्गशिक्षक वासंती पाटील आणि शिक्षकवृंदाचे त्यांना मार्गदर्शन लाभले.

**दोन विद्यार्थ्यांचेही कौतुक**

याच शाळेच्या अंश शर्मा व विराज गुरव या दोन विद्यार्थ्यांनीही ५१ व्या राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनात आजोबांची आधुनिक काठी हा प्रकल्प सादर करून आपल्या कल्पकतेचे दर्शन घडविले आहे. या प्रकल्पाची तालुका स्तरारून ठाणे जिल्हास्तरावर निवड झाली असून त्यांनीही आपल्या प्रकल्पाची माहिती आयुक्त महोदय व इतर मान्यवरांना दिली.

# माथेरान घाटात नागमोडी वळणांमुळे अपघात

## संरक्षक कठडे, रेलिंग उभारण्याची पर्यटकांकडून मागणी

**माथेरान : रामप्रहर वृत्त**

मुंबई, पुण्यापासून माथेरान हे पर्यटनस्थळ जवळ असल्यामुळे नेहमीच इथे पर्यटकांची गर्दी पहावयास मिळते. नेरळ ते माथेरानदरम्यान मिनिट्रेनच्या फेऱ्या कमी असल्याने अनेक पर्यटक आपली स्वतःची वाहने आणतात. नेरळ ते माथेरान हा सात किमीचा घाटरस्ता खूपच नागमोडी आणि अवघड वळणाचा असल्याने नवख्या वाहनचालकांना आव्हानच असते. अनेक वेळा अवघड वळणांवर अपघात होत आहेत. त्यामुळे घाटातील अवघड वळणांवर संरक्षक कठडे बसविण्याची मागणी स्थानिकांसह पर्यटकांमधून होत आहे.



नेरळ ते माथेरान हा सात किमीचा घाटरस्ता खूपच नागमोडी आणि अवघड वळणाचा आहे. दुचाकी तसेच चारचाकी वाहने चालविताना घाटरस्त्याचा अंदाज येत नाही. त्यामुळे याठिकाणी वारंवार अपघात घडत आहेत. त्यातच वॉटरपाईप स्टेशनखालील अरुंद वळणावर संरक्षक कठडे अथवा लोखंडी रेलिंग नसल्याने याच ठिकाणी अनेकदा अपघात घडले आहेत.

सुदैवाने प्रवासी किरकोळ जखमी होत असले तरीसुद्धा वाहनांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असते. पर्यटकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने सार्वजनिक बांधकाम विभाग काहीही हालचाली करीत नसून आवश्यक स्थळी सुरक्षित लोखंडी रेलिंग अथवा मजबूत कठडे बांधणे गरजेचे आहे.

वॉटरपाईप स्टेशनखालील अरूंद वळणावर नेहमीच अपघात घडत असतात. चालकांना या अवघड वळणाचा अंदाज येत नाही. त्यामुळे अपघात घडतात. आता हिवाळी पर्यटन हंगाम सुरू झाला असून मोठ्या संख्येने पर्यटक माथेरामध्ये दाखल होत आहेत. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने या गंभीर बाबीकडे लक्ष देऊन घाटातील अवघड वळणांवर संरक्षक कठडे अथवा रेलिंग बसवावे, अशी मागणी जोर धरीत आहे.

# खोपोलीत वादळी वाऱ्यामुळे विद्युत ट्रान्स्फॉर्मर आडवा

## साजगाव परिसरात काही काळ बत्ती गूल

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली शहरात अनेक दिवसांपासून पहाटेच्या सुमारास वादळी वाऱ्यामुळे भीतीचे वातावरण पसरले आहे. अनेक भागात झाडांच्या फांद्या पडणे व सर्वत्र कचरा पसरणे यामुळे नागरिक सध्या त्रस्त झाले आहेत.



या वादळी वाऱ्याचा फटका सोमवारी (दि. १८) सकाळी विद्युत मंडळाला बसला. खालापूर तालुक्यातील साजगाव औद्योगिक वसाहतीतील विद्युत मंडळाचा ट्रान्स्फॉर्मर कोसळल्याने या भागात बत्तीगुल झाली. खोपोली शहरातील श्रीरामनगर येथेही पोल पडल्याचे विद्युत मंडळाच्या कर्मचाऱ्यांनी सांगितले.

सर्व भागात विद्युत मंडळाच्या तारा तुटल्याचे सांगण्यात येत आहे. आमचे अधिकारी वर्ग सध्या कुठे कुठे नुकसान झाले याचा आढावा घेत असल्याचे खोपोली विद्युत मंडळाचे वरिष्ठ अधिकारी गडरी यांनी सांगितले.

खोपोली शहरात जे कमकुवत पोल आहेत किंवा नवीन विद्युत करण्याच्या बाबतीत विद्युत महामंडळांने २२ कोट्यवधींचे बजेट काढले आहे. लवकरच जानेवारी व फेब्रुवारी महिन्यात या कामाला सुरुवात होईल, असेदेखील त्यांनी सांगितले.

# माणगावमध्ये कारला धडकून दुचाकीस्वार ठार

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगावपासून जवळच असलेल्या कांदळगाव गावच्या हद्दीत माणगाव-पुणे रस्त्यावर भरधाव वेगात असलेल्या दुचाकीस्वाराने विरुद्ध दिशेला जात स्विफ्ट डिझायर कारला समोरून जोरात धडक दिली. या अपघातात दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला. हा अपघात ५ डिसेंबर रोजी घडला. पोलिसांनी तपास केल्यावर सोमवारी (दि. १८) या अपघाताबाबत गुन्हा दाखल केला आहे. या अपघाताच्या घटनेची फिर्याद माणगाव पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार किरण तुणतुणे (वय ३९) यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली.

घटनेतील आरोपी तथा मृत उमाकांत तुकाराम फाळके (वय ३४, रा. शिवाजीनगर वरवंड, पुणे) हा त्याच्या स्कुटी (एमएच १२ क्यूएन २५१८) वरून भरधाव वेगात पुणेहून समोरून येणाऱ्या स्विफ्ट डिझायर कार (एमएच ०९ डीए ७१४४) ला विरुद्ध दिशेला जाऊन जोरात धडक दिली. या अपघातात दुचाकीस्वार उमाकांत तुकाराम फाळके यांना गंभीर दुखापती होऊन त्यांचा मृत्यू झाला. या अपघाताची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर बर्निंग ट्रेलरचा थरार



**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर पुण्याहून मुंबईकडे जाणाऱ्या ट्रेलरला अचानक आग लागल्याने काही काळ मार्गावर भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. घटनास्थळी तातडीने अग्निशामक दल व मदत यंत्रणा पोहचल्याने आगीवर नियंत्रण मिळविण्यात यश आले. अपघात रविवारी (दि. १७) रात्री १० वा.च्या दरम्यान घडला.

पुण्याहून मुंबईकडे जाणाऱ्या ट्रेलरला अचानक आग लागली. ट्रकचालकाने इंधन वाचवण्यासाठी उतारावर ब्रेक मारीत ट्रेलर घाटातून खाली आणत असताना अचानक केबिनच्या खाली आग लागली.

ट्रकमध्ये स्टीलचे रोड सामान होते तसेच ट्रकमध्ये एलएनजी नावाचे लिक्विड गॅसचे इंधन होते. सातत्याने ब्रेक मारल्याने लाइनर गरम झाले व इंधनाने पेट घेतला. आगीचे वृत्त समजताच तातडीने अग्निशमन दल व मदत यंत्रणा घटनास्थळी दाखल झाल्या व आगीवर नियंत्रण मिळविले.

# मुरूड शहरात विकसित भारत संकल्प यात्रेचे आगमन व स्वागत

**मुरूड : प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या लोककल्याणकारी योजनांची माहिती सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहचविण्यासाठी देशपातळीवर सुरू असलेल्या विकसित भारत संकल्प यात्रेचे सोमवारी (दि. १८) मुरूडमध्ये आगमन झाले. या यात्रेचे नगर परिषदेचे सहाय्यक करनिरीक्षक नंदकुमार आंबेतकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून व श्रीफळ वाढवून स्वागत करण्यात आले.



या वेळी प्रशासक तथा मुख्याधिकारी पंकज भुसे, प्रशासकीय अधिकारी परेश कुंभार, सहाय्यक निरीक्षक नंदकुमार आंबेतकर, आरोग्य निरीक्षक राकेश पाटील, प्रकाश आरेकर, डॉ. नेहा शेंडगे, नर्स निर्मला भोसले, बँक ऑफ इंडिया मॅनेजर प्रकाश गोंजी, दिपाली दिवेकर, नयन कर्णिक, अरविंद गायकर, सुदेश माळी, अक्षता तुळसकर,उमेश शिंदे, उदय सबनीस, निलेश शेंडगे, नौनिता कर्णिक, विजय सुर्वे, अशोक विरुकुड आदींसह लाभार्थी उपस्थित होते.

प्रशासक तथा मुख्याधिकारी पंकज भुसे यांनी, विकसित भारत संकल्प यात्रेच्या माध्यमातून केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजना थेट नागरिकांपर्यंत पोहचविण्याचे कार्य केले जात आहे. प्रधानमंत्री स्वनिधी, पंतप्रधान आवास योजना, स्वच्छ भारत मिशन, आयुष्यमान भव, प्रधानमंत्री उज्ज्वला, भारतीय डाक विभागाच्या विविध योजना, राष्ट्रीय कृष्ठरोग निर्मूलन, गरोदर स्त्रिया व नवजात बालकांसाठी जननी शिशु सुरक्षा, मोफत वैद्यकीय उपचार, आधारकार्ड अपडेट अशा विविध कल्याणकारी योजनांची माहिती देण्यात येत असल्याचे सांगितले.

# माणगावच्या टिएमसी कॉलेजमध्ये कायदेविषयक मार्गदर्शन शिबिर

**माणगाव : प्रतिनिधी**

येथील जे. बी. सावंत एज्युकेशन सोसायटीच्या टिकमभाई मेथा कॉमर्स कॉलेजमध्ये शनिवारी (दि. १६) तालुका विधी सेवा समिती वकील संघ व महिला विकास कक्ष टिकमभाई मेथा कॉमर्स कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने कायदेविषयक मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.



शिबिराचे अध्यक्षस्थान जिल्हा न्यायाधीश एच. के. भालेराव यांनी भूषविले. या शिबिराला दिवाणी न्यायाधीश एम. ए. पठाण, सहदिवाणी न्यायाधीश जी. सी. फुळझळके आदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या सर्वांचे संस्थेचे पदाधिकारी रामदास पूराणिक, प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी स्वागत केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष जिल्हा न्यायाधीश एच. के. भालेराव यांनी विविध कायद्यांविषयी माहिती दिली. कार्यक्रमाच्या सुरुवातीस सहदिवाणी न्यायाधीश ए. एस. साटोरे यांनी मानसिकदृष्ट्या दिव्यांगांच्या कायद्यांविषयी मार्गदर्शन केले.

त्यानंतर सहदिवाणी न्यायाधीश एम. एस. पठारे यांनी २०१६च्या दिव्यांग कायद्यांतर्गत असलेले हक्क, अधिकार व कर्तव्ये याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

सहाय्यक सरकारी अभियोक्ता अ‍ॅड. योगेश तेंडूलकर यांनी अल्पवयीन मुलींवरील अत्याचार यासंबंधी असणाऱ्या पोक्सो कायद्याची पोक्सो कायद्यांतर्गत येणाऱ्या तरतुदी व शिक्षा याबद्दल उदाहरणांसह सविस्तर माहिती दिली. प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनीही आपले विचार व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक माणगाव येथील ज्येष्ठ विधिज्ञ अ‍ॅड. विनोद घायाळ यांनी तर प्रा. हर्षल जोशी यांनी सूत्रसंचालन केले. शिबिराला ७० विद्यार्थी उपस्थित होते.

# जे. एम. राठी स्कूलमध्ये कार्निव्हल उत्साहात

**धाटाव, रोहा : प्रतिनिधी**

जे. एम. राठी इंग्लिश स्कूल अँड ज्युनियर कॉलेज येथे शनिवारी (दि. १६) उत्साहपूर्ण कार्निव्हल उत्सव आनंदाने साजरा करीत विद्यार्थ्यांनी जल्लोषात २०२३ वर्षाची सांगता केली.



या कार्निव्हलमध्ये विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांना विविध प्रकारचे रुचकर खाद्यपदार्थ्यांचा आस्वाद घेता आला. याशिवाय अनेक गंमतीशीर खेळ, नृत्य, संगीत आणि अनेक कार्यक्रमांचा यात समावेश होता. हा एक असा दिवस आहे जो विद्यार्थ्यांना अभ्यासाच्या व्यस्त वेळापत्रकातून विश्रांती देत त्यांचे ताणतणाव दूर करण्यासाठी असे उपक्रम राबवले जाते. कार्निव्हलला प्रमुख अतिथी म्हणून महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्यासह शाळेच्या संचालिका रचना राठी, शिक्षक, प्राध्यापक, विद्यार्थी, पालक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या, मी देखील याच शाळेची विद्यार्थी आहे. जेव्हा जेव्हा मी शाळेत येते त्या वेळी माझ्या जुन्या आठवणींना उजाळा मिळतो. या जागेतून मला खूप सकारात्मक ऊर्जा प्राप्त होते. येथे माझ्या अनेक सुखद आठवणी आहेत. शाळेचे उपक्रम हे नेहमीच विद्यार्थ्यांना प्रेरणा देणारे असतात. अशा कार्यक्रमातून पालक, शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील संवाद अधिक खुलून येते. यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या दैनंदिन जीवनातून काही आनंदाचे क्षण अनुभवता येतात. या अशा उपक्रमासाठी मी व्यवस्थापनाचे कौतुक करते.

संचालिका रचना राठी म्हणाल्या, या कार्निव्हल महोत्सवाने शाळेचे मैदान दुमदुमले ही फारच आनंदाची बाब आहे. आपल्या व्यस्त जीवनशैलीतून पालकही आपल्या मुलांसाठी वेळ काढत येथे उपस्थित राहिले हे पाहून फार आनंद झाला. या कार्निव्हलमध्ये स्टॉल्सदेखील उभारण्यात आले. महत्त्वाचे म्हणजे हे स्टॉल शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या सहकाऱ्याने उभारण्यात आले. त्याचबरोबर मुलांच्या आवडीचे फूड कोर्टसह विविध राईड्स आणि गेम्सचा समावेशही यामध्ये आहे. कार्यक्रमाची सांगता लकी ड्रॉने झाली.

# स्व. अण्णासाहेब देशमुख स्मृतीप्रित्यर्थ वक्तृत्व स्पर्धा

**खालापूर** : येथील पंचायत समितीचे पहिले माजी सभापती व विद्या प्रसारणी सभा चौकचे माजी अध्यक्ष स्व. यशवंतराव आनंदराव उर्फ अण्णासाहेब देशमुख यांच्या ३३व्या स्मृतीदिनप्रित्यर्थ खालापूर तालुक्यातील माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांकरिता सरनोबत नेताजी पालकर विद्यामंदिर चौक येथे बुधवारी (दि. २०) वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

अण्णासाहेब देशमुख स्मृती समितीचे ज्येष्ठ सदस्य मोहन माने यांच्या हस्ते सकाळी ९.३० वाजता स्पर्धेचे उद्घाटन होणार असून सायंकाळी ४ वाजता संस्कृतचे वरिष्ठ संशोधक व महाराष्ट्र राज्य विश्वकोश महामंडळाचे सदस्य हेमंत राजोपाध्ये यांच्या हस्ते होणार आहे.

# लग्नविधीत पारंपरिक गीतांना महत्त्व कायम

**माणगाव : प्रतिनिधी**

तुळशी विवाहानंतर सर्वत्र लग्नसोहळे सुरू झाले आहेत. लग्नविधी हे अत्यंत उत्साहात सर्वत्र साजरे होत असताना पारंपरिक पद्धती, संस्कृती जपली जात आहे. लग्नविधीच्या निमित्ताने ग्रामीण तसेच शहरी भागात विविध प्रथा परंपरांचे पालन केले जाते. या लग्नसोहळ्यांमध्ये पूर्वीपासून गीते म्हणण्याची परंपरा आहे. या लग्नगीतांतून नवरा, नवरीचे वर्णन, संस्कृती परंपरांचे वर्णन, कुलदेवता, ग्रामदेवता, इष्टदेवता यांचे वर्णन त्यांची आराधना, उपासना केली जाते.



उटणे, हळद व लग्नविधी अशा तीन दिवसांच्या विधी सर्वसाधारणपणे सर्वत्र केल्या जातात. या तिन्ही दिवसांमध्ये उठण्याची गीते वेगळी, हळदीची गीते वेगळी व लग्नसोहळ्याची गीते वेगळी असतात. या गीतातून समाजप्रबोधनही केले जाते. वरपक्ष, वधुपक्षाचे वर्णन, कुळाचार तसेच भावी आयुष्यामध्ये नवविवाहीत जोडप्यांनी कशा पद्धतीने आचरण केले पाहिजे याचे वर्णन तसेच कधीकधी गंमतीदार, विनोदी शब्दरचना या गीतातून केली जाते. स्थानिक बोलीभाषेचा आधार, लोककथा, महाभारत, रामायण यासारख्या ग्रंथांचा आधार घेत गीतरचना केलेली असते. गोड आवाजात गीते म्हणणारी एक किंवा दोन गायक महिला आसतात. त्यांना साथ सोबत करणाऱ्या इतरही मुली, महिला असतात. हे गीत गाणाऱ्या महिलांचा आदर सत्कार व मान असतो.

अलिकडे आर्थिक स्वरूपात बिदागी देण्याची पद्धती सुरू झाली आहे. प्रत्येक बोलीभाषेत ही लग्न गीते, धवले बोलली जातात. महानुभव पंथाची स्त्री साधिका महदंबेने बाराव्या शतकात धवले गीतांची रचना केली होती. श्रीकृष्ण - रुक्मिणी स्वयंवरावर आधारित धवल्यांची रचना असून या गीतातून तत्कालीन परंपरेची माहिती मिळते.

**लग्न समारंभात लोकगीते म्हणणे परंपरेचा भाग आहे. यातून वातावरण निर्मिती होते. विधीचे स्वरूप कळते. कुळाचार, रितीरिवाज, देवी-देवतांचे आवाहन केले जाते. मंगलता आणण्यासाठी ही गीते महत्त्वाची आहेत.**
**-शांताबाई पोटले,**
**लग्नगीत गायिका**

**लग्न समारंभात आधुनिकता आली असली तरी पारंपरिक गीते म्हणण्याची प्रथा सर्वत्र आहे. आपल्या संस्कृतीचे महत्त्व जपले जाते. ही गीते गाणाऱ्या महिलांना मान-सन्मान असतो.**
**-कविता मोंडे, गायिका**

# गुड टच-बॅड टचविषयी मार्गदर्शन

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

तेजस्विनी फाउंडेशन अलिबाग तसेच जे. एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने एच. डी. पाटील इंग्लिश मिडियम स्कूल नढाळ येथे गुड टच अँड बॅड टच या विषयावर मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले होते.

लायन्स क्लब ऑफ श्रीबाग डी. सी. महिला सक्षमीकरणाच्या डॉ. अ‍ॅड. निहा राऊत यांनी विविध उदाहरणे देऊन चांगला स्पर्श आणि वाईट स्पर्श कसा ओळखला पाहिजे व जर आपल्या बाबतीत असे काही होत असेल तर त्याबद्दल कोणाकडे तक्रार करावी याबद्दल सखोल मार्गदर्शन केले.

प्रकाशवाटा संस्थेच्या समुपदेशक प्राची देशमुख यांनी, व्यक्तिमत्त्वाचा विकास म्हणजे नेमकं काय हे मुलांना समजावून सांगितले. तेजस्विनी फाउंडेशन अध्यक्ष जिवीता पाटील यांनी, मुलांनी एकदा का ध्येय निश्चित केले की, त्या ध्येयापर्यंत पोहचण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत असे सांगितले.

या वेळी तेजस्विनी फाउंडेशन कायदेशीर सल्लागार अ‍ॅड. विकास पाटील, सहसचिव राखी पाटील, अ‍ॅड. स्वरुपा गायकवाड, संस्थापक जे. एम. म्हात्रे, चेअरमन डॉ. प्रीतम म्हात्रे, मुख्याध्यापिका निशा पोळेकर, तेजस्विनी फाऊंडेशन कर्जत खालापूर अध्यक्ष दिपाली कुंभार, संस्थेचे संचालक मडवी, पर्यवेक्षिका सौ. देशमुख, वृषाली मॅडम तसेच विद्यार्थी उपस्थित होते.



### किशोर-किशोरी राष्ट्रीय खो-खो स्पर्धा

# हॅट्ट्रिकसह महाराष्ट्राला आठव्यांदा दुहेरी मुकूट





**टिपटूर (कर्नाटक) : वृत्तसंस्था**

खो-खो फेडरेशन ऑफ इंडियाच्या मान्यतेने आणि कर्नाटक खो-खो असोसिएशन आयोजित ३३वी राष्ट्रीय किशोर-किशोरी खो-खो स्पर्धा कर्नाटकच्या टिपटूर जिल्ह्यातील टुमकूर येथे झाली. या स्पर्धेत महाराष्ट्राने लागोपाठ तिसऱ्या वर्षी व एकूण आठव्यांदा दुहेरी मुकूट पटकाविला आहे. महाराष्ट्राच्या किशोरांचे हे १२वे, तर किशोरींचे १७वे अजिंक्यपद आहे.

सलग दुसऱ्या वर्षी महाराष्ट्राच्या दोन्ही संघांनी कर्नाटकचा पराभव करत आपले निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले आहे. विशेष म्हणजे महाराष्ट्राचे दोन्ही कर्णधार सर्वोच्च पुरस्काराचे मानकरी ठरले. आराध्या वसावेला भरत, तर मैथिली पवारला ईला पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.

स्पर्धेतील अंतिम सामन्यात किशोर गटामध्ये महाराष्ट्राने कर्नाटकचा ३४-२२ असा १२ गुणांनी अजिंक्यपदावर नाव कोरले. पहिल्या आक्रमणात कर्णधार आराध्या वसावे (३ मि. संरक्षण आणि २ गुण) आणि आदेश पाटील (१.४० मि. संरक्षण आणि ८ गुण) यांच्या उत्कृष्ट खेळाच्या जोरावर मध्यंतराला महाराष्ट्रने १६-८ अशी ८ गुणांची आघाडी घेतली. याच जोरावर महाराष्ट्राला कर्नाटकवर सहज मात करणे शक्य झाले. हा सामना महाराष्ट्राने सहज खिशात घातला. दुसऱ्या डावातही आराध्याने आक्रमक खेळ (३ गुण) केला. त्याला भिमसिंग वसावे (२.५० मि. संरक्षण), ओमकार सावंत (४ गुण), महेश पाडवी (४ गुण) यांची चांगली साथ मिळाली. कर्नाटकतर्फे रोषन (१.५०,१.३० मि. संरक्षण), व्हि. देवराग (१.५० १ मि. संरक्षण व २ गुण) यांनी दिलेली लढत अपुरी ठरली.

किशोरी गटातही महाराष्ट्राने कर्नाटकचा १६-१४ असा एक डाव २ गुणांनी सहज धुव्वा उडवला. विजयी महाराष्ट्र संघातर्फे कर्णधार मैथिली पवार (२, १.३० मि. व ६ गुण), स्नेहा लोमकाणे (१.२०, १.४० मि. संरक्षण व ६ गुण), वैष्णवी चाफे (२, १.२० मि. संरक्षण) यांनी उत्कृष्ट खेळ केला. कर्नाटक संघांकडून नगमा थोली (१ मि. संरक्षण व ४ गुण), गौतमी (२ मि. संरक्षण) यांनी एकहाती लढत देण्याचा केलेला प्रयत्न फसला व यजमान कर्नाटकवर मोठा विजय साजरा केला व अजिंक्यपदाचा मान मिळविला.

## एमएनएम विद्यालय व टीएनजी कनिष्ठ महाविद्यालयात वार्षिक क्रीडा महोत्सव

**अरुणशेठ भगत यांच्या हस्ते उद्घाटन**



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या गव्हाण कोपर येथील मोरू नारायण म्हात्रे (एमएनएम) विद्यालय व तुकाराम नारायण घरत (टीएनजी) कनिष्ठ महाविद्यालयात आयोजित वार्षिक क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते सोमवारी (दि.१८) झाले.

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देत दरवर्षी विद्यालयात वार्षिक क्रीडा महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. यंदाही वार्षिक क्रीडा महोत्सव आयोजित करण्यात आला.

उद्घाटन समारंभास सन्माननीय वसंतशेठ पाटील, रघुनाथ देशमुख, अनंताशेठ ठाकूर, गव्हाणचे उपसरपंच विजय घरत, विद्यालयाचे चेअरमन भार्गव ठाकूर, किशोर पाटील, श्रीकांत घरत, कमलाकर देशमुख, सुधीर ठाकूर, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका प्रणिता गोळे, पर्यवेक्षक अरुण जोशी, सुजाता पाटील, राजेश पाटील, श्री. घोडगे, रवी भोईर आदी उपस्थित होते. मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या.

## आमदार चषक कुस्ती स्पर्धेत नितळस तालमीचे पैलवान चमकले



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्व. धाया दामा शेळके यांच्या स्मरणार्थ पाली खुर्द येथे जय बापदेव ग्रुपच्या वतीने आमदार प्रशांत ठाकूर चषक रायगड जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धा रविवारी (दि.१७) आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत नितळसच्या छत्रपती संभाजी महाराज राष्ट्रीय कुस्ती संकुलामधील तालमीतील पैलवानांनी आखाडा गाजवला.

स्पर्धेस भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस राजेंद्र पाटील, माजी पं.स. सदस्य भूपेंद्र पाटील, युवा नेते योगेश लहाने, राष्ट्रीय कुस्तीपटू वस्ताद रूपेश पावशे आदी उपस्थित होते.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर मार्गदर्शक असलेल्या नितळस तालमीचे पैलवान विकास पावशे व साजन पावशे या दोघांनी चांदीची गदा पटकाविली. त्यांना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. चमकदार कामगिरीबद्दल दोघांचेही अभिनंदन होत आहे.

## पनवेलमधील स्केटिंगपटू तुर्या नाईकची महाराष्ट्र संघात निवड



**पनवेल : वार्ताहर**

रोलर ॲथेलेटिक्स महाराष्ट्र स्टेट स्केटिंग चॅम्पियनशीप नुकतीच खोपोली येथे झाली. या स्पर्धेत पनवेलमधील रोलर स्केटिंग खेळाडू तुर्या नाईक हिची नॅशनल चॅम्पियनशिपसाठी महाराष्ट्राच्या संघात निवड झाली आहे.

राज्यस्तरीय स्पर्धेत पनवेलमधील टी ७५ रोलर स्केटिंग क्लबची खेळाडू तुर्या नाईक हिने चार वर्षांखालील गटात दोन कांस्यपदके पटकावून पनवेलचे नाव पुन्हा एकदा उंचावले आहे. तुर्या हिचे वय अवघे चार वर्ष असून ती अडीच वर्षापासून स्केटिंगचे प्रशिक्षण घेत आहे. तिला प्रशिक्षक आणि महाराष्ट्र संघाचे कर्णधार प्रसाद ढवळे यांचे मार्गदर्शन लाभत आहे. तुर्याच्या यशात आजोबा प्रल्हाद नाईक यांचाही वाटा आहे.

तुर्या महाराष्ट्राच्या संघातून राज्याचे प्रतिनिधित्व करणार आहे. याबद्दल तिचे कौतुक होत आहे.

## थाई बॉक्सिंग स्पर्धेत माथेरान व्हॅली स्कूलचे यश



**कर्जत : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य थाई बॉक्सिंगच्या वतीने कल्याण येथे डिस्ट्रीक्ट थाई बॉक्सिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत नेरळजवळील वंजारपाडा येथे असलेल्या माथेरान व्हॅली इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी पदके जिंकली.

या स्पर्धेत ठाणे आणि रायगड जिल्ह्यातील अनेक शाळा, महाविद्यालयांतील थाई बॉक्सिंगपटूंनी सहभाग घेतला होता. माथेरान व्हॅली स्कूलच्या वेदिका पेरणे, गार्गी ठोंबरे, झरा शेख, नीरजा माळी, रूपाली भुरभुडा, प्रथम गरुडे, समीर रावते यांनी सुवर्ण; कुणाल भुसाटे, दीपक तळपाडे, हस्तिका रोज, श्वेता जाधव, यश इंदुलकर, फैज शेख यांनी रौप्य; तर श्रेया नायडू, श्रुती किर्ले, राणी दवडा, ऋतुजा इड, दीक्षांत भोईर, अंश मुजुमदार, पंकज विरले, कुणाल दळवी, सुनील सोनावणे, रूपेश इड, प्राची मिश्रा यांनी कांस्यपदक मिळविले. यशस्वी विद्यार्थ्यांचे शाळेकडून कौतुक व अभिनंदन करण्यात आले.

## गिरगाव जायंट्स संघ बीईपीएलचा विजेता



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ब्राह्मण सभा नवीन पनवेल प्रस्तुत युवोन्मेष समुहाच्या वतीने ब्राह्मण एकता प्रीमियर लीग (बीईपीएल) या बॉक्स क्रिकेट स्पर्धेचे आयोजन सुकापूर येथील मैदानावर करण्यात आले. या स्पर्धेत गिरगाव जायंट्स संघाने विजेतेपद प्राप्त केले, तर कुडाळ (सिंधुदुर्ग) येथील जय केसरकर संघ उपविजेता ठरला.

या स्पर्धेला शिवसेना पनवेल शहरप्रमुख ॲड. प्रथमेश सोमण, ब्राह्मण सभेच्या सचिव मंजुषा भावे, साहित्यिक शंकर आपटे आदींसह क्रिकेटरसिकांची उपस्थिती होती. स्पर्धा चुरशीच्या परंतु खेळीमेळीच्या वातावरणात रंगली. सुयश भट मालिकावीर आणि उत्कृष्ट फलंदाज, तर निखिल आपटे याला उत्कृष्ट गोलंदाज म्हणून गौरविण्यात आले.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी माजी नगरसेविका रूचिता लोंढे, भाजप सांस्कृतिक सेल उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, ब्राह्मण सभा नवीन पनवेल अनिरुद्ध पेंडसे, मेधा मैलुरकर, अतुल जोशी, सृष्टी दिक्षित, रूपाली बोंद्रे, पद्मनाभ भागवत, आशिष कुलकर्णी, केदार जोशी, महेश पेंडसे, पद्मनाभ भागवत, मनोहर दामले, मनोहर आपटे, मिलिंद दाबके यांनी मोलाचे योगदान दिले.

**सांस्कृतिक, शैक्षणिक व सामाजिक उपक्रमात ब्राह्मण समाज नेहमी पुढाकार घेतो तसाच क्रीडा क्षेत्रातही पुढे यावा याचबरोबर सकल ब्राह्मण समाजाला एकत्र आणण्यासाठी युवोन्मेष समूहाने या स्पर्धेचे भव्य आयोजन केले.**
**-शार्दूल दामले, समन्वयक, युवोन्मेष समूह**

## पदार्पणाच्या सामन्यात साई सुदर्शनचे अर्धशतक



**जोहान्सबर्ग : वृत्तसंस्था**

दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात भारताच्या साई सुदर्शनने आपली निवड योग्य असल्याचे सिद्ध केले. त्याने पदार्पणाच्या सामन्यात नाबाद ५५ धावा करीत टीम इंडियाला विजयाकडे नेले. यासह त्याने अशी कामगिरी केली, जी त्याच्या आधी भारतासाठी फक्त तीन सलामीवीर फलंदाजी करू शकले.

भारतीय संघाने रविवारी जोहान्सबर्ग येथे पहिल्या एकदिवसीय सामन्यात यजमान दक्षिण आफ्रिकेचा आठ गडी राखून पराभव केला. डावखुरा वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंग (१०-०-३७-५) पहिल्या एकदिवसीय सामन्यात सामनावीर ठरला. आवेश खानने घेतलेल्या चार विकेट्सशिवाय, श्रेयस अय्यरनेही अर्धशतक झळकावले, परंतु पहिल्या आंतरराष्ट्रीय एकदिवसीय सामन्यात नाबाद अर्धशतक झळकावणाऱ्या २२ वर्षीय साई सुदर्शनने सर्वांची मन जिंकली.

डावाच्या सुरुवातीला फलंदाजी करताना साईने उसळत्या चेंडूविरुद्ध चांगले बचावात्मक तंत्र दाखवले. नंतर काही उत्कृष्ट फटके मारले. ४३ चेंडूंत नऊ चौकारांसह नाबाद ५५ धावांची खेळी त्याने करून आपले भविष्य उज्ज्वल असल्याचे दाखवून दिले. साई कारकिर्दीतील पहिल्या एकदिवसीय सामन्यात पन्नास किंवा त्याहून अधिक धावा करणारा चौथा भारतीय सलामीवीर ठरला.

सुदर्शनपूर्वी रॉबिन उथप्पाने २००६मध्ये इंग्लंडविरुद्ध नाबाद ८६ धावा केल्या होत्या. के. एल. राहुलने २०१६मध्ये झिम्बाब्वेविरुद्ध नाबाद १०० धावा केल्या होत्या, तर विदर्भाकडून रणजी ट्रॉफी खेळणाऱ्या फैज फजलने २०१६मध्ये झिम्बाब्वेविरुद्ध नाबाद ५५ धावा केल्या होत्या.

## ऑस्ट्रेलियाकडून पाकिस्तानचा लाजिरवाणा पराभव



**पर्थ : वृत्तसंस्था**

जागतिक कसोटी अजिंक्यपद विजेत्या ऑस्ट्रेलियाने पहिल्या कसोटी सामन्यात पाकिस्तानवर ३६० धावांनी मात केली. या सामन्यात ऑस्ट्रेलियाचा फिरकीपटू नाथन लायनने कसोटी क्रिकेटमध्ये ५०० गडी बाद करण्याचा टप्पा ओलांडला.

चौथ्या दिवशी यजमान ऑस्ट्रेलियाने आपला दुसरा डाव २३३ धावांवर घोषित करीत पाकिस्तानपुढे ४५० धावांचे मोठे लक्ष्य ठेवले होते, मात्र मिचेल स्टार्क, जोश हेझलवूड, पॅट कमिन्स या वेगवान त्रिकुटापुढे पाकिस्तानचा डाव अवघ्या ८९ धावांत संपुष्टात आला. नाथन लायननेही महत्त्वपूर्ण दोन बळी घेतले. मालिकेत १-०ची आघाडी घेताना ३६० धावांनी विजयी ठरलेल्या ऑस्ट्रेलियाने मायदेशात पाकिस्तानवर नोंदवलेला हा सलग १५ वा कसोटी विजय ठरला.

तत्पूर्वी ऑस्ट्रेलियाच्या दुसऱ्या डावात सलामीवीर उस्मान ख्वाजाचे शतक अवघ्या १० धावांनी हुकले. ४ बाद १०७ अशी अवस्था असताना ख्वाजा आणि मिशेल मार्श यांनी १२६ धावांची भागीदारी केली. पहिल्या डावात ९० आणि दुसऱ्या डावात ६३ धावा करणारा मिशेल मार्श सामनावीर ठरला. तीन कसोटी सामन्यांमधील दुसरा सामना २६ डिसेंबर 'बॉक्सिंग डे'ला मेलबर्न क्रिकेट ग्राऊंडवर खेळविला जाईल.

### लायनचे पाचशे बळी

पाकिस्तानच्या फहीम अशरफला पायचित बाद करत फिरकीपटू नाथन लायनने कसोटी क्रिकेटमधला आपला ५००वा बळी पूर्ण केला. यासह आंतरराष्ट्रीय कसोटी क्रिकेटमध्ये ५०० गडी बाद करणारा लायन हा तिसरा ऑस्ट्रेलियन गोलंदाज ठरला. याआधी शेन वॉर्न आणि ग्लेन मॅग्रा यांनी हा पराक्रम केला आहे. दिग्गज ऑस्ट्रेलियन गोलंदाजांच्या क्लबमध्ये दाखल झाल्याने संघसहकाऱ्यांनी लायनचे अभिनंदन केले.

## विराटसारख्या खेळाडूंमुळेच कसोटी क्रिकेट जिवंत -रवी शास्त्री

**मुंबई : प्रतिनिधी**

माजी भारतीय क्रिकेटपटू आणि मुख्य प्रशिक्षक रवी शास्त्री यांनी विराटसारख्या खेळाडूंमुळेच कसोटी क्रिकेट अजूनही जिवंत आहे असे म्हणत त्याचे कौतुक केले आहे.

भारतीय क्रिकेटचा स्टार फलंदाज विराट कोहली विश्वचषकानंतर प्रथमच क्रिकेटच्या मैदानात परतण्यासाठी सज्ज झाला असून तो कसोटी क्रिकेटमधून पुनरागमन करत आहे. विश्वचषकानंतर कोहलीने मर्यादित षटकांच्या मालिकेतून ब्रेक घेतला होता. आता तो दक्षिण आफ्रिकेतील सेंच्युरियन येथे २६ तारखेपासून सुरू होणाऱ्या पहिल्या कसोटीसाठी तयारी करीत आहे.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com